मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, बुधवार, ९ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०९ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## राज्यात दोन-चार दिवसांत आचारसंहिता : अजित पवार

**बारामती :** राज्यात दोन-चार दिवसांत आचारसंहिता लागू होणार असल्याचे संकेत आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीतील एका कार्यक्रमानिमित्त बोलताना दिले. बारामतीत उद्योग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अजित पवार यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडल्या आहेत. आज अजित पवार यांच्या उपस्थित बारामतीत उद्योग मेळावा पार पडला. यादरम्यान राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन- चार दिवसात अचारसंहिता लागू होणार असल्याची शक्यता अजित पवार यांनी व्यक्त केली.



पार्ले टिळक शाळेच्या दोन माजी विद्यार्थ्यांनी सर केले एव्हरेस्ट पान 7

# हरियाणात तिसऱ्यांदा फुललं कमळ

वृत्तसंस्था
चंदीगड

हरियाणात भाजप तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. राज्यात असे करणारा हा एकमेव पक्ष असेल. राज्यातील एकूण 90 जागांपैकी पक्षाने 48 जागा जिंकून बहुमत मिळवले आहे. 2 जागांची अधिकृत घोषणा बाकी आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी 8 जागांची वाढ झाली आहे.

दुसरीकडे, काँग्रेसने 37 जागांवर विजय मिळवला आहे.मुख्यमंत्री नायब सैनी लाडवा आणि काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्र हुड्डा गढी-सांपला मतदारसंघातून विजयी झाले आहेत. काँग्रेसने हा निकाल धक्कादायक असल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्री सैनी म्हणाले की, जनतेने काँग्रेसचा खोटारडेपणा नाकारला आहे. भाजपच्या आघाडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांना फोन करून विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन केले .



### भाजपच्या विजयामागे EVM बॅटरी, 99 टक्के चार्जिंग असेल तर भाजपचा विजय

**काँग्रेसचा आरोप**

***नवी दिल्ली:*** *हरियाणातील निवडणुकीचा निकाल लोकभावनेच्या विरोधात असून हा लोकशाहीचा पराभव असून तंत्राचा विजय असल्याचा आरोप काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे. हरियानातील निकाल स्पष्ट झाल्यानंतर काँग्रेसचे सरचिटणीस खासदार जयराम रमेश व राष्ट्रीय प्रवक्ता पवन खेडा यांनी पत्रकार परिषद घेऊन या निकालाच्या संदर्भात निकालाच्या संदर्भात अनेक आक्षेप घेतले. अनेक मतमोजणी केंद्रांमध्ये ईव्हीएम मशिनची बॅटरी 99 टक्के होती. ही साधारणतः 60 ते 70 टक्के एवढी राहते. ज्या ईव्हीएमची बॅटरी 99 टक्के होती त्या मशीनमधील निकाल भाजपच्या बाजूने लागले तर ज्या मशिनची बॅटरी 60 ते 70 टक्के होती. त्या मशीनमधील निकाल काँग्रेसच्या बाजूने लागले. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारही काँग्रेसच्या उमेदवारांनी दाखल केल्या आहेत. या तक्रारी अजूनही मिळत असून येत्या दोन-तीन दिवसात या तक्रारीबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाला निवेदन दिले जाणार असल्याचेही खासदार जयराम रमेश यांनी सांगितले.*

# काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्सचे सरकार

## काँग्रेसही सत्तेत, ओमर अब्दुल्ला होणार मुख्यमंत्री

वृत्तसंस्था
श्रीनगर

जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवल्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला 49 जागा मिळाल्या. आघाडीत समाविष्ट नॅशनल कॉन्फरन्सला सर्वाधिक 42 जागा, काँग्रेसला 6 आणि माकपला एक जागा मिळाली. सरकार स्थापनेसाठी 46 जागांची गरज आहे.

भाजपने 29 जागा जिंकल्या आहेत. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत पक्षाला 4 जागांचा फायदा झाला आहे. मात्र, जम्मू-काश्मीर भाजपचे अध्यक्ष रविंदर रैना नौशेरा मतदारसंघातून एनसी उमेदवाराकडून सुमारे 8 हजार मतांनी पराभूत झाले. त्यांनी आपला राजीनामा पक्षप्रमुखांकडे पाठवला आहे.

माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांचा पक्ष पीडीपीने 3 जागा जिंकल्या आहेत. गेल्या निवडणुकीत पक्षाला 28 जागा मिळाल्या होत्या.



पहिल्यांदाच निवडणूक लढवत असलेल्या मेहबूबा यांची मुलगी इल्तिजा मुफ्ती यांचा श्रीगुफ्वारा बिजबेहारा मतदारसंघातून 9 हजारांहून अधिक मतांनी पराभव झाला. जम्मू-काश्मीरमध्ये आम आदमी पक्षाने पहिल्यांदाच विजयाची नोंद केली आहे. दोडा मतदारसंघातून मेहराज मलिक यांनी भाजपच्या गजयसिंह राणा यांचा 4500 हून अधिक मतांनी पराभव केला. तर पीपल्स कॉन्फरन्सने एक जागा जिंकली. 7 वर अपक्ष विजयी झाले. संसद हल्ल्यातील आरोपी अफजल गुरूचा भाऊ एजाज गुरूला सोपोरमधून 129 मते मिळाली.

नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला म्हणाले, ओमर अब्दुल्ला हे जम्मू-काश्मीरचे पुढील मुख्यमंत्री असतील. ओमर अब्दुल्ला यांनी दोन जागांवर (बडगाम आणि गंदरबल) निवडणूक लढवली आणि दोन्ही जागांवर पीडीपी उमेदवारांचा पराभव केला.


जम्मू-काश्मीरमध्ये 18 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत 3 टप्प्यांत 63.88 टक्के मतदान झाले. 10 वर्षांपूर्वी 2014 मध्ये झालेल्या निवडणुकीत 65% मतदान झाले होते. यावेळी 1.12% कमी मतदान झाले. 5 ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या एक्झिट पोलमध्ये, 5 सर्वेक्षणांनी NC-काँग्रेस सरकारचे भाकीत केले होते, तर 5 सर्वेक्षणांनी त्रिशंकू विधानसभा असल्याचा दावा केला होता.

# महाराष्ट्राने दिल्लीतील दोन ठगांची गुलामगिरी का स्वीकारावी ?

## उद्धव ठाकरेंचा पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहांवर हल्लाबोल

प्रतिनिधी
मुंबई

शिवसेनेची (उद्धव बाळासाहेब ठाकरे) राज्यव्यापी वज्र निर्धार परिषद मुंबईतील दादरमधील शिवाजी मंदिरात पार पडली. यावेळी लोकशाही, संविधान आणि महाराष्ट्र धर्माचा जागर करण्यात आला. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लोकशाही, संविधान आणि महाराष्ट्र धर्माच्या मुद्द्यावरून केंद्रातील सत्ताधाऱ्यांवर वज्राघात केला.



आताचं हे मोदी सरकार दुर्दैवानं परत सत्तेत बसलं आहे, हे संविधान बदलायला निघालं होतं. त्याच्या मनातलं काळं बाहेर आलंच होतं. आता ते कितीही म्हणो की हा फेक नरेटिव्ह, हा त्यांचाच शब्द आहे त्याला ते बळी पडले. तसं नाही, शेवटी अनुभवाचे बोल जास्त महत्त्वाचे आहेत. गुरू हा लागतोच मात्र अनुभवासारखा दुसरा गुरू नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले. गुजराती आणि मराठी असा वाद कधीच नव्हता आणि तो होऊ नये, अशी आमची इच्छा आहे. पण तुमच्याच भाषेत तुम्ही जे सांगितलं की ठग तिथे बसलेत, एक मान्य करावं लागेल की त्यांनी गुजरात आणि संपूर्ण देश अशी भिंत बांधली आहे, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

**न्यायहक्क मागणं हा काही गुन्हा नाही!**

अयोध्येत का हरले? वाराणसीत मतांचे अंतर का कमी झाले? अयोध्येत हिंदुत्ववादी नाही का? अयोध्येत जिथे घाईघाईत, गळकं राम मंदिर बांधलं. निवडुणकीच्या आधी उरकायचं म्हणून तो कार्यक्रम उरकला. एवढं होऊन सुद्धा तो तिथला तिथला राम तुम्हाला का पावला नाही? अयोध्येत तुमचा पराभव कुणी केला? याचं कारण जे कारसेवक तिथे गेले होते त्यांनी बलिदान दिलं ते कशासाठी दिलं? भाजपच्या मर्जीतल्या कंत्राटदारांना सारं देण्यासाठी का? आता पुजारी देखील तिकडून आणताहेत. का करताहेत हे सगळं? शिवसेना जी स्थापन करण्यात आली ती यासाठी की प्रत्येक राज्यात तिथल्या भूमिपुत्रांना न्याय मिळाला पाहिजे, महाराष्ट्राच्या भूमिपुत्रांना न्याय मिळालाच पाहिजे. याचा अर्थ असा नाही की आम्ही इतरांचे शत्रू आहोत. न्यायहक्क मागणं हा काही गुन्हा नाही. असंत उद्धव ठाकरेंनी ठणकावलं. न्यायहक्क मागणं हा गुन्हा असल्याचं संविधानात लिहिले नाही. तो प्रत्येकाला त्याचा न्याय हक्क मिळालाच पाहिजे,असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

शिवसेनाप्रमुखांचं असं मला एक वाक्य दाखवा की सर्व मुसलमान आपले शत्रू असल्याचं ते म्हणाले आहेत. आमचा लढा जो आहे तो महाराष्ट्र प्रेमी, देशप्रेमी विरुद्ध महाराष्ट्रद्रोही- देशद्रोही, असा आहे. या देशासाठी मी जीव द्यायला तयार आहे असं कुणी बोलणारा असेल अशी लोकं होऊन देखील गेली आहेत. देशात जात पात धर्माने कुणीही असला तरी तो आमचा हिंदू आहे हे आमचं धोरण आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

असं एक क्षेत्र सांगा की जिथे इतर राज्यांपेक्षा माझा महाराष्ट्र मागे आहे, कोणतच नाही. माझा महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. हा आपला महाराष्ट्र, माझा महाराष्ट्र आहे. आणि असा महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात पुढे असल्यानंतर पान 7 वर

## म ह त्त्वा चे

### पोटच्या मुलाकडून वडिलांचा खून

**पुणे:** दौंड शहरात घराबाहेर काढल्याच्या कारणावरून एका बेरोजगार तरूणाने रागाच्या भरात वडिलांचा खून केला आहे. शहरातील साठेनगर भागात ही घटना घडली. सुनील लक्ष्मण रणदिवे (वय-५७, रा. साठेनगर, दौंड) असे मृत वडिलांचे नाव आहे. सुनील रणदिवे यांचा मुलगा सचिन सुनील रणदिवे (वय-३५) हा विवाहित असून कौटुंबिक वादातून त्याची पत्नी सोलापूर येथे माहेरी निघून गेली होती. तिला परत आणण्यासाठी सचिन गेला असता तिने येण्यास नकार दिल्याने तो ६ ऑक्टोबर रोजी दौंड येथे परतला. त्या रागाच्या भरात सचिन याने आईवडिलांशी वाद घातला. रविवारी रात्री सचिन हा घरी परतला व रागाच्या भरात त्याने घरासमोर झोपलेल्या वडिलांच्या डोक्यात त्याने काँक्रीट पेव्हर ब्लॉक मारला. गंभीररित्या जखमी झालेल्या सुनील रणदिवे यांच्यावर दौंड उप जिल्हा रूग्णालयात प्रथमोपचार करून पुणे येथील ससून सर्वोपचार रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु ७ ऑक्टोबर रोजी उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले.

### AI चे गॉडफादरला भौतिकशास्त्रातील नोबेल

**स्टॉकहोम:** 2024 चा भौतिकशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. यंदा हा पुरस्कार एआयचे गॉडफादर म्हणून ओळखले जाणारे जेफ्री ई. हिंटन आणि अमेरिकन शास्त्रज्ञ जॉन जे. होपफिल्ड यांना मिळाला. कृत्रिम न्यूरॉन्सवर आधारित मशीन लर्निंगशी संबंधित नवीन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे. जेफ्री यांना मशीन लर्निंगसाठी नोबेल पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे त्यांनी एआय हा मानवतेसाठी धोका असल्याचे वर्णन केले होते.

# धनगर आंदोलक 'वर्षा'वर धडकले

## घोषणाबाजी करत दिला निर्वाणीचा इशारा

प्रतिनिधी
मुंबई

धनगर आरक्षणाचा मुद्दा तापत चालला आहे. मंगळवारी आंदोलकांनी मंत्रालयातील जाळयांवर उड्या घेतल्यानंतर सायंकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्याबाहेर आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचा निषेध केला.धनगर बांधवांनी वर्षा निवासस्थानासमोर घोषणाबाजी आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला.

सरकारने धनगर एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीचा जीआर तात्काळ काढावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. वर्षा निवासस्थानाबाहेर आंदोलन करणाऱ्या धनगर बांधवांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. धनगर आरक्षणाच्या बाबतीत सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.



दुसरीकडे याच मुद्द्यावरून धनगर समाज दुपारी आक्रमक झाला. आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाचे काही कार्यकर्ते मंत्रालयात आले. यावेळी त्यांनी आक्रमक पवित्रा घेत थेट मंत्रालयाच्या सुरक्षा जाळीवर उड्या मारल्या. तसेच जोरदार आंदोनल छेडले. त्यानंतर बराच वेळ मोठा गोंधळ निर्माण झाला होता.

यावेळी पोलिसांनी धावपळ करत आंदोलकांना जाळीवरुन काढले. मंत्रालयाच्या प्रत्येक माळयावर आंदोलकांना बघण्यासाठी गर्दी झाली होती. त्यानंतर आंदोलकांनी आपल्या आरक्षणासंबंधीच्या मागण्या सरकारकडे पोहोचवल्या.

# आदिवासी आमदारांप्रमाणे धनगर नेत्यांनीही मंत्रालयातील जाळीवर मारली उड्या

प्रतिनिधी
मुंबई

गेल्या काही दिवसांपासून आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यातील वातावरण तापताना दिसत आहे. चार दिवसांपूर्वी धनगर समाजाला आदिवासी कोट्यातून आरक्षण देण्याच्या निर्णयाविरोधात आदिवासी समाजाच्या आमदारांकडून मंत्रालयात आंदोलन करण्यात आले होते. यावेळी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह काही आदिवासी आमदारांनी मंत्रालयातील सुरक्षा जाळीवर उड्या मारून आंदोलन केले होते. यानंतर आता धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावरून सुरक्षा जाळीवर उड्या मारल्या.

विधानसभा निवडणूक घोषित झाल्यास धनगर आरक्षणाचा निर्णय मागे पडण्याची शक्यता लक्षात घेऊन धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीचे निमित्त साधून आंदोलन छेडण्याचे ठरवले होते. मंत्रिमंडळ बैठक 'सह्याद्री' अतिथीगृह येथे होणार असल्याने कार्यकर्ते सुरुवातीला 'सह्याद्री'वर जाणार होते. मात्र, आजची



मंत्रिमंडळ बैठक रद्द झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आपला मोर्चाचे मंत्रालयात वळविला. आज संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास सकल धनगर समाजाचे 15 कार्यकर्ते मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावर पोहचले. तेथून तीन कार्यकर्त्यांनी मंत्रालयातील सुरक्षा जाळीवर उड्या मारून घोषणाबाजी सुरू केली. तर उर्वरित कार्यकर्त्यांनी तिसऱ्या मजल्यावर घोषणा द्यायला सुरुवात केली. अनपेक्षितपणे झालेल्या या आंदोलनाने पोलिसांची तारांबळ उडाली. पोलिसांनी सुरक्षा जाळीकडे धाव घेत कार्यकर्त्यांनी पकडून बाहेर काढले. यावेळी कार्यकर्त्यांनी धनगर आरक्षणाचा शासन निर्णय त्वरित काढा, अशी मागणी केली. पोलिसांनी या सर्व कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात नेले.

# ...तर हॉर्न बनवणंच आता बंद करावं लागेल



प्रतिनिधी
मुंबई

आता वाहनांचे हॉर्न बनवणंच बंद करावं लागेल, त्याशिवाय ध्वनी प्रदूषण आटोक्यात येणारच नाही, असं परखड मत मुंबई उच्च न्यायालयानं मंगळवारी व्यक्त केलं. हॉर्नच्या आवाजामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होतं. ज्या गोष्टी धोकादायक आहेत त्याची निर्मिती थांबवणं हाच पर्याय आता शिल्लक आहे. प्लॅस्टिक हे पर्यावरणासाठी घातक आहे. आता माशांच्या पोटातही प्लॅस्टिक जमा होतंय. त्यामुळे कमी मायक्रॉनचं प्लॅस्टिक बनवणंच बंद करायला हवं, असा सल्लाही यावेळी हायकोर्टानं दिला आहे.

**हायकोर्टाचा गंभीर इशारा**

नवरात्र उत्सवात उल्हासनगर परिसरात होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाविरोधात स्थानिक समाजसेविका सरीता खानचंदानी यांनी हायकोर्टात याचिका दाखल केलीय. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. मोठ्या आवाजाची तक्रार करण्यासाठी उल्हासनगरमध्ये एक खास टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात आला आहे. या क्रमाकांची जाहिरात वृत्तपत्रात देण्यात आली आहे. उल्हासनगरमधील शाळेतील मुलांना ध्वनी प्रदूषणाच्या दुष्परिणांमाची माहिती द्या जेणेकरुन ते आईवडिलांना सांगतील की आवाज कमी ठेवत जा. याचिकाकर्त्या सरीता खानचंदानी यांनीदेखील शाळेतून जनजागृती करावी. पालिका व पोलिसांनीही त्यांना यात मदत करावी, असंही न्यायालयानं आपल्या निर्देशांत स्पष्ट केलं. उल्हासनगर रेल्वे स्थानकाजवळ व अन्य परिसरात रिक्षाच्या हॉर्नमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते. ध्वनी प्रदुषण रोखण्यासाठी रिक्षा चालकांमध्ये वाहतूक पोलिसांनी जनजागृती करावी. कारण शहर पोलिसांवर कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असते, असंही खंडपीठानं नमूद केलं आहे.

# मुख्यमंत्र्यांची तब्येत बिघडली

## दिवसभरातील सर्व कार्यक्रम रद्द

प्रतिनिधी
मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आजचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती ठीक नसल्याने शिंदेंचे आजचे सर्व कार्यक्रम हे रद्द करण्यात आले, असे समजते. तर यासह आज होणारी मंत्रिमंडळ बैठक देखील रद्द झाली.

विधानसभा निवडणुका तोंडावर असताना आजची महत्त्वाची मंत्रिमंडळ बैठकही रद्द करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर



दौरा हा पाचव्यांदा रद्द झाल्याची माहिती मिळते. आज सोलापूरमध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम पार पडणार होता. या कार्यक्रमाची तयारीही पूर्ण झाली होती. मात्र आज मुख्यमंत्री नसताना दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.

# मृतदेहाचा पंचनामा करायला गेले अन् पोलीस उपनिरीक्षक पुलावरून खाली पडले



## प्रकृती चिंताजनक

प्रतिनिधी
मुंबई

मुंबईच्या दहिसर परिसरातील भगवती रुग्णालयाच्या जवळील पुलाखाली बेवारस अवस्थेत आढळलेल्या मृतदेहाचा पंचनामा करताना 15 फूट उंचावरून नाल्यात पडून पोलीस अधिकारी गंभीर जखमी झाला आहे. मुकेश खरात, असं जखमी झालेल्या पोलीस उपनिरीक्षकांचे नाव आहे. काल सायंकाळी साडेचार वाजता ही घटना घडली.

बेवारस मृतदेहाचा पंचनामा करत असताना रेल्वेचा भोंगा ऐकून मुकेश खरात हे पंधरा फूट खोल नाल्यात पडले. पुलावरून पडल्यामुळे पोलीस अधिकाऱ्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली असून बेशुद्ध अवस्थेत त्यांना बोरिवलीच्या करुणा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. प्राथमिक उपचारानंतर आता पुढील उपचारासाठी मुकेश खरात यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलले जात आहे.

काल दुपारच्या सुमारास दहिसर पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या सुधीर फडके उड्डाणपुलाखाली एक बेवारस महिलेचा मृतदेह असल्याची माहिती एम एच बी कॉलनी पोलिसांना फोनवरून मिळाली. माहिती मिळताच कर्तव्यावर असलेले पोलीस उपनिरीक्षक मुकेश विष्णू खरात हे आपल्या टीमसोबत घटनास्थळावर पोहोचले. पोलीस उपनिरीक्षक खरात आणि त्यांच्या टीम कडून बेवारस मृतदेहाचा पंचनामा देखील करण्यात आला.

यानंतर महिलेचा तो मृतदेह शेवटन करण्यासाठी पालिकेच्या भगवती रुग्णालयाकडे पाठवण्यात आलं. मात्र त्याच दरम्यान रेल्वे रुळावरून जात असताना जोराचा भोंगा वाजवण्यात आला त्यामुळे उड्डाणपूला खालील खांबावर उभे असलेल्या पोलीस उपनिरीक्षक खरात हे गोंधळून गेले आणि मागे पाहत असताना त्यांचा तोल जाऊन ते पंधरा फूट खाली नाल्यात पडले. नाल्यातील दगड गोट्यांवर डोके आदळल्यामुळे डोक्याला गंभीर इजा झाली. सोबत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी खरात यांना बोरिवली पश्चिमेकडील करुणा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. करुणा रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर आता खरात यांना पुढील उपचारासाठी हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कोलकत्यात 50 वरिष्ठ डॉक्टरांचा राजीनामा देशभरात आज उपोषण

**स्टॉकहोम:** आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये मंगळवारी सामूहिक राजीनामे देण्यात आले. आमरण उपोषण करणाऱ्या कनिष्ठ डॉक्टरांच्या समर्थनार्थ 50 वरिष्ठ डॉक्टरांनी राजीनामे दिले आहेत. वृत्तसंस्था पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, मंगळवारी वैद्यकीय महाविद्यालयात अनेक विभाग आणि त्यांच्या प्रमुखांची बैठक झाली. या बैठकीत राजीनामा देण्याचा निर्णय घेण्यात आला. एका वरिष्ठ सदस्याने सांगितले, 'कनिष्ठ डॉक्टर एका कारणासाठी आमरण उपोषण करत आहेत. आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत आणि हा संदेश देण्यासाठी आम्ही राजीनामा दिला आहे. सहा कनिष्ठ डॉक्टरांच्या आमरण उपोषणाचा आज चौथा दिवस आहे. ते म्हणाले की, आम्ही कोणत्याही बाह्य दबावापुढे झुकणार नाही. सर्व मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे.

*मुंबई : काँग्रेस आढावा बैठकीचे आयोजन नुकतेच भायखळा येथील अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात करण्यात आले. या बैठकीमध्ये काँग्रेस नेते शमीम अन्सारी, रवी प्रकाश जाधव, अशोक गर्ग, आदित्य माहीमकर आणि इतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.*



## थोडक्यात

### आज पालिकेच्या सहाय्यक परीचारिकांचा मोर्चा

**मुंबई:** आपल्या हक्काची कालबद्ध पदोन्नती देण्यास पालिका प्रशासनाने प्रचंड विलंब लावलेला असल्याने, परिचारिकांचे खूपच आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे प्रत्येक सहाय्यक परिचारिका प्रसविकेच्या मनामध्ये प्रचंड असंतोष व तीव्र नाराजी पसरली आहे. कालबद्ध पदोन्नती विनाविलंब मिळवून घेण्याकरिता, आज बुधवार, ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता, एफ/ दक्षिण कार्यालय येथे मोर्चा काढण्यात येणार आहे. आजच्या मोर्चानंतर न्यायोचित निर्णय न झाल्यास, होणाऱ्या जाहीर सभेमध्ये पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येईल. असे दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी सांगितले. आपल्यावर करण्यात आलेल्या अन्यायाला वाचा पोडण्यासाठी, सर्वांनी वेळेवर एफ/ दक्षिण कार्यालय येथे जमावे. असे आवाहनही त्यांनी सहाय्यक परिचारिकांना केले.

### भायखळा येथे इमारतीचा भाग कोसळला

**मुंबई:** भायखळा (प.) येथे म्हाडाच्या चार मजली इमारतीचा एका बाजूचा संपूर्ण भाग मंगळवारी दुपारच्या सुमारास अचानकपणे कोसळला. सुदैवाने यामध्ये कोणीही जखमी झाले नाही. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टिने सदर इमारतीमधील ३० रूम आणि ८ दुकाने खाली करण्यात आले आहेत. व त्यांची नजीकच्या शाळेत पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तर काही रहिवाशांनी आपल्या नातेवाईकांच्या घरी आश्रय घेतल्याचे समजते. भायखळा (पश्चिम), मौलाना आझाद रोड, मदनपुरा, येथे अस्तित्वात असलेल्या तळमजला अधिक तीन मजली अशी एकूण चार मजली २३७ करीम, इमारतीमध्ये मंगळवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास इमारतीच्या एका बाजूचा संपूर्ण भाग अचानकपणे कोसळला. त्यामुळे इमारतीमध्ये खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. मात्र या घटनेनंतर म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पाहणी केली.

### 'धर्मवीर 2' चित्रपटाचा मोफत शो

**घाटकोपर:** सध्या महाराष्ट्रात नवरात्रोत्सव सुरू असून 'धर्मवीर २' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलाच गल्ला जमवला आहे. नवरात्रीत महिलांसाठी शिवसेना शिंदे गटाकडून 'धर्मवीर २' चित्रपटाच्या मोफत शोचे आयोजन रविवारी (ता. ६) घाटकोपर पूर्वेतील आयनॉक्समध्ये करण्यात आले होते. शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक दीपक बाबा हांडे, माजी नगरसेविका अश्विनी दीपक हांडे यांनी आयोजित केलेल्या या मोफत शोचा ६०० हून अधिक महिलांनी लाभ घेतला. नवरात्रीनंतरदेखील हा चित्रपट महिलांना दाखवण्यात येणार आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसई-विरारमध्ये फेरीवाला 'राज' राजकीय वरदहस्ताचा खेळ

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत फेरीवाल्यांचा प्रचंड सुळसुळाट झाला आहे. महापालिकेच्या अधिकृत आकडेवारीनुसार सध्या १७,००० फेरीवाले कार्यरत असल्याचे समजते, परंतु प्रत्यक्षात ही संख्या लक्षाधीशांच्या जवळ असल्याचे स्थानिकांचे मत आहे. फेरीवाल्यांचे हे वाढते प्रमाण शहराच्या दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण करत आहे, आणि या समस्येच्या मुळाशी राजकीय पक्ष आणि त्यांचे पदाधिकारी असल्याचा आरोप केला जात आहे.



वसईतील मुख्य रस्ते, फूटपाथ आणि बाजारपेठांमध्ये फेरीवाल्यांनी कब्जा केला असून, त्यामुळे सार्वजनिक रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होतो. पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागाच मिळत नाही, आणि वाहनचालकांनाही रस्त्यावरील गर्दीमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे, फेरीवाले फक्त रस्त्यांवरच नाही, तर आठवडी बाजारांमधूनही व्याप वाढवत आहेत, ज्यामुळे रहदारी नियंत्रित करणे कठीण झाले आहे. ही परिस्थिती राजकीय पक्षांच्या आशीर्वादामुळे अधिकच बळावली आहे. काही राजकीय पदाधिकारी आणि कार्यकर्ते फेरीवाल्यांना आर्थिक फायदा मिळवून देण्याच्या बदल्यात मोकळीक देत असल्याचे स्थानिकांचे निरीक्षण आहे. अनेक पदाधिकारी स्वतःच्या फायद्यासाठी आठवडी बाजारांना चालना देत आहेत, जिथून त्यांना आर्थिक फायदा होतो.

नागरिकांनी महापालिकेकडून या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या मते, पालिकेची आकडेवारी दिशाभूल करणारी असून, खऱ्या परिस्थितीवर तातडीने धडक कारवाई करून फेरीवाल्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. महापालिकेने कठोर पावले उचलून शहरात सुस्थिती आणावी, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे.

## वालीवकरांची गुड मॉर्निंग 'बत्तीगुल'ने !

# विजेच्या समस्यांवर उपायासाठी आमदार राजेश पाटील यांची वालीवकरांनी घेतली भेट

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई पूर्वेतील वालीव विभागातील नागरिकांना दररोज विजेच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे त्यांची सकाळ खराब होत आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते जगदीश भोईर आणि महेश धनगर यांनी बोईसरचे आमदार राजेश पाटील यांची भेट घेतली.

गेल्या काही आठवड्यांपासून वालीव विभागातील प्रभाग क्रमांक ७३ आणि ७६ मध्ये वीज वितरणाची अडचण निर्माण झाली आहे. विठ्ठल मंदिरापासून शालिमार हॉटेलपर्यंत असलेली LT लाईन पूर्णपणे पुन्हा स्थापित करणे आवश्यक आहे, त्यामुळे नागरिकांना व विद्यार्थ्यांना वीज समस्यांपासून आराम मिळेल.

याशिवाय, नालासोपाऱ्यातून येणाऱ्या HT लाईनवर मोठा वीज भार असल्यामुळे वीजपुरवठ्यात अनेकवेळा अडथळे येत आहेत. वसई येथून या HT लाईनचा योग्य विभाजन झाल्यास वीज वितरणातील तांत्रिक समस्या दूर होऊ शकतात. आमदार राजेश पाटील यांना याबाबत निवेदन देण्यात आले. वालीवकरांना वीज देयके नियमितपणे भरूनही तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. बहुजन विकास आघाडीने या समस्येवर प्रभावीपणे लक्ष केंद्रित केले असून, वीज समस्यांचे समाधान होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# कर्मवीर विद्यालयात मानवी तस्करीविषयी जनजागृती मोहिमेचे आयोजन

**प्रतिनिधी**
■ **वसई**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आणि एसपी ज्युनिअर कॉलेज, जुचंद्र येथे मुंबई स्माईल या सामाजिक संस्थेच्या वतीने मानवी तस्करी या गंभीर समस्येवर जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष जनजागृती मोहिम आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य विलासराव जगताप यांच्या प्रास्ताविकाने झाली, ज्यात त्यांनी विद्यार्थ्यांना मानवी तस्करीच्या गंभीरतेबाबतची माहिती दिली. कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून सामाजिक सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक सुरभी शरदचंद्र पवार, रयत शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थीनी, उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मानवी तस्करीच्या संदर्भातील कायदेशीर तरतुदी, तसेच पीडित व्यक्तींना मिळणाऱ्या संरक्षणाबाबत माहिती दिली.

शनिवार, 5 ऑक्टोबर रोजी आयोजित कार्यक्रमात, माध्यमिक विभागातील मुलींना पोलीस निरीक्षक सुरभी पवार यांनी



स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले आणि त्याबाबत काही आवश्यक तंत्र शिकवले. मानवी तस्करीच्या स्वरूपाबद्दल आणि तिच्या सामाजिक परिणामांबद्दल माहिती देण्यासाठी मुंबई स्माईलच्या प्रकल्प प्रमुख विकास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच, मुंबई स्माईलचे सदस्य कालिदास रोटी यांनी मानवी तस्करीची कार्यपद्धती, तिचे दुष्परिणाम आणि त्यावरील उपाययोजना याबाबत माहिती दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य विनय पाटील आणि विद्यालयाचे पर्यवेक्षक राजेंद्र काकड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश गवळी यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांचे आभार सुधीर भोसले यांनी मानले.या मोहिमेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मानवी तस्करीच्या विषयावर जागरूकता वाढवण्यात आली असून, मानवी तस्करीविरुद्धच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना एक जबाबदार नागरिक म्हणून तयार करण्यात मदत होईल, हे निश्चित आहे.

## बविआ-मविआ युतीची शक्यता

# आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाची लागणार कसोटी

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार आणि बोईसर या महत्वाच्या मतदारसंघात बहुजन विकास आघाडीला (बविआ) आपली पकड कायम राखण्याचं मोठं आव्हान उभं आहे. विशेषतः ज्येष्ठ नेते राजीव पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा आणि लोकसभेत आलेल्या अपयशामुळे बविआच्या नेतृत्वासमोर एक प्रकारची राजकीय कोंडी निर्माण झाली आहे. या परिस्थितीत, बविआचे सर्वेसर्वा आणि आमदार हितेंद्र ठाकूर यांना आपला ३० वर्षांचा राजकीय अनुभव पणाला लावावा लागणार आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी बविआची महाविकास आघाडीत (मविआ) जाण्याची चर्चा जोर धरत आहे.

राजकीय वर्तुळात, ठाकरे गटातील नेत्यांनी आमदार हितेंद्र ठाकूर यांची भेट घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. या चर्चांच्या पार्श्वभूमीवर, बविआ आणि मविआची युती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजीव पाटील जर भाजपमध्ये प्रवेश करतात, तर बहुजन विकास आघाडी महाविकास आघाडीसोबत हातमिळवणी करून पाटील यांच्या राजकीय कोंडीची तयारी करु शकते. मात्र ही युती राजीव पाटील यांच्या आगामी निर्णयावर अवलंबून असेल.

वसईत ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि बहुजन विकास आघाडी एकत्र आल्यास वसई, नालासोपारा आणि बोईसर हे तीन मतदारसंघ बहुजन विकास आघाडीच्या हक्काचे असतील. त्यामुळे महाविकास आघाडीच्या इच्छुक उमेदवारांना बविआच्या नेतृत्वाखाली काम करावे लागणार आहे.

वसईतील ख्रिस्ती आणि मुस्लिम समाज लोकसभेत ठाकरे गटाच्या उमेदवारांना मतदान करताना दिसले होते, परंतु बविआ मविआसोबत आल्यास या समाजाचे कितपत मतदान मिळेल, हे सांगणे धाडसाचे ठरेल. राजीव पाटील यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नसली, तरी जर त्यांना भाजपकडून तिकीट मिळाले नाही, तर ते वेगळा निर्णय घेऊ शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या परिस्थितीत बविआ आणि मविआची युती निश्चित होऊ शकते.

आगामी विधानसभा निवडणूक ही बविआसाठी एक मोठी कसोटी ठरणार आहे. वन मॅन आर्मी म्हणून ओळख असलेल्या आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मुत्सद्देगिरीला या काळात कठीण परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. बविआला मविआसोबत जोडून घेण्याची चाचपणी सध्या सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.



*मुंबई : मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंगळवारी सह्याद्री अतिथीगृह येथे समितीचे अध्यक्ष मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत मराठा संघटनांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. याप्रसंगी आरक्षण समितीचे मंत्री शंभूराज देसाई, भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर, आमदार राजेंद्र राऊत, प्रसाद लाड, मराठा आरक्षण समन्वय समितीचे प्रदेशाध्यक्ष सुभाष जावळे, अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील, मराठा क्रांती ठोक मोर्चाचे केरेपाटील यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी, अधिकारी वर्ग उपस्थित होते.*

# चेंबूरच्या सिद्धार्थनगरमधील दुर्घटना स्थळाची ना. रामदास आठवलेंनी केली पाहणी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

चेंबूर येथील सिद्धार्थनगर मधील आग लागून झालेल्या भीषण दुर्घटनास्थळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शोकाकुल गुप्ता कुटुंबियांची आस्थेने विचारपूस केली. तसेच त्यांना सर्वतोपरी धीर देऊन आधार देत दिलासा दिला.

दुर्घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर ही दुर्घटना अत्यंत मनाला दुःखाचा चटका लावणारी आहे. गंभीर आहे. गुप्ता कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाय. या दुर्घटनेची सखोल चौकशी व्हावी.. अशा दुर्घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी शासनाने खबरदारी घेणारे उपाय योजावेत तसेच या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना संत्वांनपर अर्थिक मदत शासनाने करावी अशी मागणी ना रामदास आठवले यांनी केली आहे.

यावेळी ना. रामदास आठवलेंची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सिद्धार्थ नगर मध्येच दुर्घटनास्थळाजवळ भेट झाली.यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, माजी खासदार राहुल शेवाळे, तसेच मुंबई महापालिकेचे अधिकारी आदी उपस्थित होते.

**पालघर नगरपरिषद, पालघर**

**जाहीर ई निविदा सूचना - (द्वितीय मुदतवाढ)**

पालघर नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकरिता दि.२६/०९/२०२४ रोजी वृत्तपत्रात जाहीर ई - निविदा तसेच दि.०३/१०/२०२४ रोजी दै. वृत्तपत्रात जाहीर प्रथम ई - निविदा मुदतवाढ सुचना प्रसिद्धी देऊन www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आल्या होत्या. परंतु विहित मुदतीत दि. ०८/१०/२०२४ रोजी पर्यत योग्य तो प्रतिसाद न लाभल्याने टेंडर आयडी क्र.2024_DMA_1092877_1 सदर निविदा प्रक्रीयेस दि. १४/१०/२०२४ रोजी पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.

जावक क्र. पानप/कार्या/६६१३/२०२४-२०२५
दि.०८/१०/२०२४

सही/-
प्रशासक तथा मुख्याधिकारी
पालघर नगरपरिषद

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व प्राधिकरणाचे घटक मंडळ**

म्हाडा MHADA

**निविदा सुचना क्र. २ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, वांद्रे विभाग, मुंबई मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ३२१, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ यांनी खाली दर्शविलेल्या कामांकरीता उप निबंधक मुंबई (पश्चिम), उपनगर जिल्हा यांच्याकडे नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था / सोसायटी कडून योग्य त्या प्रणालीसाठी ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई निविदा क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५०% अगोदर व ५०% देयकातून) | मजूर सहकारी संस्था नोंदणी वर्गवारी | निविदा रक्कम (१८% जीएसटीसहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | न.भू.क्र. १५६ जोगेश्वरी (पूर्व), मेघवाडी पोलीस स्टेशन समोरील आ.जी. प्लॉट वरील अतिक्रमण निष्कासन करुन संरक्षण भिंत बांधणे. | २५,४८,५०४.०० | २६,०००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १२ महीने पावसाळ्या सहीत |
| २ | डी. एन. नगर, अंधेरी (प), येथील सेवा निवासस्थान इमारत क्र. १० / सदनिका क्र. १८३. १८७ व १९६ मधील अंतर्गत दुरुस्ती करणे. | १४,३९,१६९.०० | १५,०००.०० | वर्ग ब व त्यावरील | ५९०.०० | १२ महीने पावसाळ्या सहीत |
| ३ | जुहू आदर्श, इमारत क्र. १० व ११, डी. एन. नगर, अंधेरी (प), दिमक/ वाळवी विरोधी उपचार धोकादायक सदनिका व जिन्याचा भागाकरीता टेकू लावणे व मीटर रूम दुरुस्ती करणे, व छतावरील पाण्याच्या टाकीचा काहीसा कोसळलेला भाग बदलणं व तोडणे. गंजलेली पाण्याची पाईप लाईन बदलणं. | २४,९७,५१७.०० | २५,०००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १२ महीने पावसाळ्या सहीत |
| ४ | डी. एन. नगर, अंधेरी (प), येथील सेवा निवासस्थान इमारत क्र. १० / सदनिका क्र. १९२, १९४, १९५ मधील अंतर्गत दुरुस्ती करणे. | १४,७३,६९२.०० | १५.०००.०० | वर्ग ब व त्यावरील | ५९०.०० | १२ महीने पावसाळ्या सहीत |
| ५ | भारत नगर येथील रस्त्याच्या कडेला उघडी गटारे, गटारलाईन डब्लु सी ब्लॉक, इन्स्पेक्शन चेंबरची साफसफाई करणे. | १५,९६.३३४.०० | १६.०००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १२ महीने पावसाळ्या सहीत |
| ६ | सेवा निवासस्थान इमारत, उपवन, अंधेरी (प) येथील सदनिका क्र. २१, २४, ३२, ३३, ३४, ५४ व ६१ मधील अंतर्गत दुरुस्ती त्र रंगरंगोटी करणे. | ४८, ०१,७९१.०० | ४९,०००.०० | वर्ग अ | ५९०.०० | १२ महीने पावसाळ्या सहीत |

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | जाहिरात दिनांक | ०९/१०/२०२४ |
| २ | निविदा विक्री सुरू | ०९/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता |
| ३ | निविदा विक्री बंद | १६/१०/२०२४ सायंकाळी १७:४५ वाजता |
| ४ | निविदा स्विकृती सुरू | ०२/१०/२०२४ सकाळी १०:३५ वाजता |
| ५ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | १६/१०/२०२४ सायंकाळी १७:४५ वाजता |
| ६ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १७/१०/२०२४सायंकाळी १७:३५ वाजता नंतर |
| ७ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | १८/१०/२०२४ सायंकाळी १७:३५ वाजता नंतर |

१) संपूर्ण निविदा पध्दती ही ऑनलाईन स्वरूपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्थी http://mahatenders.gov.in. म्हाडाच्या MHADA Website http://mhada. maharashtra. gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द केल्या जातील
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि. ०९/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० नंतर ते १६/१०/२०२४ सायंकाळी १७.४५ वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम तसेच इसारा रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक १७/१०/२०२४ रोजी सायंकाळी १७:३५ व आर्थिक बोली उघण्याचा दिनांक १८/१०/२०२४ रोजी सायंकाळी १७:३५ नंतर कार्यकारी अभियंता/ वांद्रे विभाग/ मुंबई मंडळ, खोली क्र. ३२१, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१, यांचे दालनात उघडल्या जातील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोली मध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉर्मेट मध्ये तांत्रिक बोलीच्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग ॥ / ॥। मान्यताप्राप्त प्राधिकारणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंत/ वांद्रे विभाग / मुंबई मंडळ, यांचेकडे ( निविदा स्विकृती अधिका-यांकडे ) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) निविदाकारांनी अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम, बँक हैपतदारी आणि इतर कागदपत्रे सादर करणेबाबत सविस्तर निविदा सुचना पाहावी.
१०) निविदाकारांनी जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करावे.
११) मागविण्यात आलेली ई-निविदा सन २०१७-१८ च्या जिल्हा दरसुचीवर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल. तसेच सन २०१४-१५ च्या जिल्हा दरसुचींच्या निविदेमधील कामांवर तत्कालीन कर प्रणाली लागू होईल.
१२) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सुचना http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता घेतील. मदतीसाठी : १८००-३०७०-२२३२ Mail eproc. support@maharashtra.gov.in
१३) निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेनंतर व दिनांक १६/१०/२०२४ सायंकाळी. १७.४५ वाजेपर्यंत मोहरबंद लिफाफा कार्यकारी अभियंता वांद्रे विभाग मुंबई मंडळ यांचे कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

CPRO/A/921

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता
वांद्रे विभाग, मुंबई मंडळ

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 109**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १०९**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

वृत्तमानस
मुंबई
मुंबई, बुधवार, ९ ऑक्टोबर २०२४

*मुंबई : शिवसेना वडाळा विधानसभा आणि आयोजक शिवसेना महाराष्ट्र विस्तारक निलेश बडदे यांनी आयोजित केलेल्या घरगुती गणेश मकर सजावट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच दादर येथे जल्लोषात पार पडला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सचिन आहिर, विभागप्रमुख महेश सावंत, माजी महापौर श्रद्धा जाधव,नगरसेविका उर्मिला पांचाळ, आणि इतर मान्यवर मंडळी आणि पदाधिकारी उपस्थित होते. यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.*



# गुरुवारी पालिकेच्या नवीन के-उत्तर वॉर्डचे उद्घाटन व आरेतील अंतर्गत रस्त्याच्या कामाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

## आरेतील रत्याच्या दुरुस्तीसाठी तब्बल रुपये ६६ कोटी मंजूर




प्रतिनिधी
■ मुंबई

गेली अनेक वर्ष जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांचे प्रयत्न व पाठपुराव्यामुळे जोगेश्वरीकरांसाठी उभारण्यात आलेल्या स्वतंत्र मुंबईमहानगरपालिकेच्या नवीन वॉर्ड ऑफिसचे उद्घाटन व आरेतील अंतर्गत रस्ते दुरुस्ती कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात जोगेश्वरी, अंधेरी व गोरेगाव या विभागाचा समावेश होतो. गेल्या काही वर्षात या विधानसभेच्या लोकसंखेत वाढ झाल्याने या ठिकाणी नवीन वॉर्ड निर्माण करावा यासाठी खासदार रविंद्र वायकर यांनी जोगेश्वरी विधानसभेचे आमदार असताना महापालिका, राज्य शासन यांच्या बरोबर पत्र व्यवहार केला. विधीमंडळात विविध आयुधांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केले होते. तब्बल १५ वर्षांचे प्रयत्न व पाठपुराव्यामुळे जोगेश्वरी पूर्व येथे महापालिकेचा नवीन वॉर्ड सुरु करण्यात येत आहे. के-उत्तर नावाने हा नवीन वॉर्ड ओळखला जाणार असून तो पूनम नगर येथील मजास मंडई ज्याला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मनपा माजास मंडई असे नाव देण्यात आले आहे, तेथे तो सुरु करण्यात येणार आहे. हा नवीन वॉर्ड सुरु झाल्याने जोगेश्वरीकरांचे बरेच श्रम वाचणार आहेत.

आरेतील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करण्या ऐवजी डांबरीकरणासाठी तब्बल रुपये ६६ कोटीच्या कामास प्रशासकिय मंजुरी देण्यात आली आहे. या कामाचे भूमिपूजन ही मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहेत. आदर्श मेघवाडी एस.आर.ए गृहनिर्माण संस्था हा प्रकल्प गेले अनेक वर्ष रखडला होता. येथील रहिवासी त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित होते. खासदार रविंद्र वायकर यांनी यशस्वी मध्यस्थी करून रखडलेला प्रकल्प पूर्णत्वास नेला. तेथील एकूण राहिवाशांपैकी २३९ रहिवाशाना घरांच्या चाव्या मुख्यमंत्री यांच्या हस्ते देण्यात येणार आहेत.

# वांद्र्यात 174 खाटांच्या कर्करोग रुग्णालयाची पायाभरणी

## आ.ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते भूमिपूजन



प्रतिनिधी
■ मुंबई

कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर उपचार करणे सर्वसामान्य गरीब नागरिकांना परवडत नाही. या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेच्या वतीने वांद्रे (पश्चिम) येथे उभारण्यात येणाऱ्या स्वतंत्र कॅन्सर रुग्णालयाची पायाभरणी मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते आज झाली. तेरा मजली १७४ खाटांच्या स्वतंत्र कॅन्सर रुग्णालयामुळे हजारो रुग्णांना मोठा दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी शिवसेना विभाग प्रमुख कुणाल सरमळकर, माजी नगरसेविका अलका केरकर, स्वप्ना म्हात्रे, हेतल गाला यांच्यासह महापालिका वॉर्ड ऑफिसर विनायक विसपुते आणि पालिका अधिकारी उपस्थित होते.

वांद्रे येथील भाभा रुग्णालयासमोर असणाऱ्या महापालिकेच्या भूखंडावर स्वतंत्र कॅन्सर हॉस्पिटल असावे, अशी संकल्पना स्थानिक आमदार मुंबई भाजपा अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी मुंबई महापालिकेकडे मांडली होती. पालिकेने ही मागणी मान्य केली आहे. १७४ खाटांच्या या सर्व सुविधांयुक्त कॅन्सर रुग्णालयाच्या बांधकामासाठी २१३ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या रुग्णालयाचे बांधकाम आगामी ३६ महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. या इमारतीमध्ये तळघर १ ते ८ मजले रुग्णालय असेल आणि ९ व १० मजल्यावर कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाची व्यवस्था असेल. तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची सुविधा ही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### अश्या मिळतील "सुविधा"

रुग्णालयात केमोथेरपीपासून ब्रॅकीथेरपी आणि रेडिएशनपर्यंत, अतिदक्षता विभागासह संपूर्ण कर्करोगाची काळजी घेणारे हे अद्ययावत रुग्णालय असेल. सुमारे १३ हजार चौरस मीटर पेक्षा जास्तच्या बांधकाम क्षेत्रासह दोन तळघर असतील. रेडिएशन थेरपीसाठी दोन बंकर खोल्या असलेल्या या इमारतीत १२ ओपीडी वॉर्ड, बायोकेमिस्ट्री, हिस्टोपॅथॉलॉजी, हेमॅटोलॉजी आणि मायक्रोबायोलॉजी यांसह पाच प्रयोगशाळा असणार आहेत. डायग्नोस्टिकमध्ये, मॅमोग्राफी आणि पीईटी-सीटी युनिट्सदेखील असतील. रुग्णालयाच्या इमारतीत लेक्चर हॉल, सेमिनार हॉल, रक्तपेढी आणि आयसोलेशन असेल. रुग्णांच्या नातेवाइकांसाठी वसतिगृहासारखी सुविधा निर्माण केली जाणार आहे.

# महासागरातील प्लास्टिक कचरा कमी करण्यासाठी सामंजस्य करार




प्रतिनिधी
■ मुंबई

संपुर्ण जगात समुद्रात होणारे प्लास्टिक प्रदूषण ही खूप गंभीर समस्या भेडसावत आहे. मुंबई शहराच्या समुद्रातील प्लास्टिकचे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि ते रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने क्लीन रिव्हर्स फाउंडेशन नेदरलँड व भारत क्लीन फाउंडेशन मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य करार केला आहे. ओशन क्लीनअप नेदरलँड व त्यांची भारतातील सहभागी संस्था भारत क्लीन रिव्हर्स फाऊंडेशन मुंबईत गेल्या दोन वर्षांपासून समुद्रात मिसळणाऱ्या जाणाऱ्या प्लास्टिक प्रदूषणावर संशोधन करीत आहे.

हा सामंजस्य करार स्वाक्षरी करताना म.प्र.नि.मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, भारत क्लीन रिव्हर्स फाउंडेशनचे चेअरमन शैलेश हरिभक्ती, विश्वस्त आमदार सत्यजीत तांबे आदी मान्यवर उपस्थित होते.

# दिवाळी सणासाठी सी एसएमटी - लातूर साप्ताहिक विशेष ट्रेन

**मुंबई:** 01105 साप्ताहिक विशेष गाडी 19.10.2024 ते 09.11.2024 पर्यंत दर शनिवारी 00.30 वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सुटेल आणि लातूर येथे त्याच दिवशी ११.४० वाजता पोहोचेल. या ४ सेवा असणार आहे. तर 01106 साप्ताहिक विशेष शनिवारी १९.१०.२०२४ ते दि. ०९.११.२०२४ दरम्यान लातूर येथून ४.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी ४.१० वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, उरुळी, दौंड, भिगवण, जेऊर, केम, कुर्डूवाडी, बारसी टाऊन, उस्मानाबाद आणि हरंगुळयेथे थांबे देण्यात आले आहेत. सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर विशेष शुल्कावर विशेष ट्रेनच्या सर्व विस्तारित फेऱ्यांसाठी बुकिंग आधीच सुरू आहे या विशेष ट्रेनच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा.

# भीम आर्मीची आजपासून दीक्षाभूमी ते चैत्यभूमी सामाजिक न्याय यात्रा

प्रतिनिधी
■ मुंबई

भीम आर्मी भारत एकता मिशन या सामाजिक संघटनेची उद्या बुधवारपासून नागपूर दीक्षाभूमी ते दादर चैत्यभूमी अशी सामाजिक न्याय यात्रा निघत आहे . या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विनय रतन सिंग यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या या यात्रेदरम्यान मेळावे,तसेच कार्यकर्ता संवाद सभा घेण्यात येणार असून भारतीय संविधान आणि महाराष्ट्रातील सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर या यात्रेत खुली चर्चा करण्यात येणार आहे .


भीम आर्मी संस्थापक व आजाद समाज पार्टी (कांशीराम ) चे अध्यक्ष ॲड चंद्रशेखर आजाद यांनी आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रावर लक्ष्य केंद्रित करण्याचे ठरविले आहे . याचाच एक भाग म्हणून भीम आर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष विनय रतन सिंग हे उद्यापासून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत.

सिंग यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात दिनांक 9 ऑक्टोबर ते 12 ऑक्टोबर 2024 अशी सामाजिक न्याय यात्रा काढण्यात येणार आहे. 9 ऑक्टोबर सकाळी 11 वाजता दीक्षाभूमी नागपूर येथून या यात्रेचा प्रारंभ होत असून दुपारी नागपूर येथील कामठी रोड येथील बॅरिस्टर राजभाऊ खोब्रागडे सभागृह येथे दुपारी १ वाजता सामाजिक न्याय सभेचे आयोजन करण्यात आले आहे सादर सभेनंतर १० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता बुलढाणा येथी मलकापूर रॉड येथील बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी सभागृहात कार्यकर्ता संवाद सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सभेनंतर लातूर शहरात मराठवाडास्तरीय सामाजिक नाय सभेचे आयोजन करण्यात आले आहे .

लातूरनंतर सोलापूरमार्गे हि यात्रा पनवेल येथून मुंबईत प्रवेश करणार असून 12 ऑक्टोबर रोजी दादर चैत्यभूमी येथे येथे दुपारी पोहचेल. सदर यात्रेदरम्यान विधानसभा निवडणुकीसाठी ईच्छुक उमेदवारांच्या गाठीभेटी तसेच चाचपणी देखील यावेळी करण्यात येणार आहे. असे भीम आर्मीचे राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे यांनी सांगितले.



आपण एका अद्भुत जगात राहतो. जे सौंदर्य, आकर्षण आणि रोमांचाने भरपूर आहे.



- पंडित जवाहरलाल नेहरू

वृत्तमानस

मुंबई, बुधवार, ९ ऑक्टोबर २०२४

# संकटातून मजबुती...

सध्याचे जग हे तंत्रज्ञान आधारित आहे. स्मार्टफोन, कॉम्प्युटर हे आता रुजले आहे. आता काळ आहे तो कृत्रिम बुद्धिमत्ता, 'इंटरनेट ऑफ थिंग्स'चा. या सर्वासाठी महत्त्वाचा घटक आहे तो म्हणजे सेमीकंडक्टर चिप. स्मार्टफोन, स्मार्टवॉच, कार, फ्रीज, टीव्ही, खेळणी, ड्रोन आणि अशा कित्येक उपकरणांत या चिपची महत्त्वाची भूमिका आहे. सध्या सेमीकंडक्टर क्षेत्राचे जागतिक पातळीवर ५०० ते ६०० अब्ज डॉलर इतके मूल्य आहे. यावर आधारित इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाचे जागतिक मूल्य तीन ट्रिलियन डॉलर इतके आहे. जे वाढतच जाणार आहे यात शंका नाही. थोडा गत इतिहास पाहिला तर असे जाणवते की १९६५ ते १९७५ हे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील प्रचंड उलथापालथ करणारे दशक ठरले होते. पण त्याच वेळी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींनी भारतातील हरितक्रांतीचा पाया रचला. आज भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. दुसरे उदाहरण १९९१चे. भारताची आर्थिक स्थिती रसातळाला पोहोचली त्यावेळी मिळणाऱ्या कर्जाच्या बदल्यात भारताने उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण स्वीकारावे, अशा अटी होत्या. पण, या संकटामुळे सुधारणांचा वेग वाढला. त्या संकटाचे संधीत रूपांतर झाले. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिका दौऱ्यात भारताला सेमीकंडक्टर हब करण्याचा निर्धार केला आहे. हे मोठे आव्हान असले तरी यावर लीलया मात करत येत्या काळात अनेक सेमीकंडक्टर प्रकल्प देशात तयार होतील अशी आशा आहे. या प्रकल्पांमुळे रोजगारनिर्मितीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार असल्याने त्याचा दुहेरी फायदा अपेक्षित आहे. सध्याच्या भूराजकीय परिस्थितीत प्रत्येक देश थोड्याफार प्रमाणात देशांतर्गत सेमीकंडक्टरनिर्मिती क्षमता उभारण्याचा प्रयत्न करत आहे. भारत सुद्धा त्यास अपवाद नाही. पंतप्रधान मोदी यांनी आत्मनिर्भर भारत परियोजनेची घोषणा केली. त्यानुसार कोविड काळात आर्थिक अरिष्टातून त्वरित बाहेर पडण्यास भारतीय उद्योगांना आधार देण्यात आला, पण त्याचबरोबर अनेक नव्या क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोडक्शन लिंक्ड इन्सेन्टिव्ह ही संकल्पना मांडण्यात आली. ही योजना मोबाईल फोन, एसी, औषधी, वस्त्रप्रावरण, अन्न प्रक्रिया, नागरी उड्डाण इत्यादी क्षेत्रांसह सेमीकंडक्टर चिप निर्मिती क्षेत्रासाठी देखील आणण्यात आली आहे. दहा वर्षांपूर्वी भारतातील डिजिटल अर्थव्यवस्था ही काही निवडक कंपन्यांकडून देण्यात येणारी टेक सर्व्हिस इतपतच मर्यादित होती. पण आता डिजिटल अर्थव्यवस्थेचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे आणि त्यात संशोधनासह अनेक घटक समाविष्ट झाले आहेत. भारतातील तंत्रज्ञान क्षेत्र आणि त्याचे भविष्य केवळ इंटरनेट आधारित सेवा, उत्पादन यासह इलेक्ट्रनिक्स आणि सेमीकंडक्टर क्षेत्रातही विस्तार निश्चित होणार आहे. हाच विस्तार आणि भारत एक सेमीकंडक्टर निर्मिती करणारा देश म्हणून उभा राहण्यासाठी प्रोडक्शन लिंक्ड इन्सेन्टिव्ह योजना आणण्यात आली. उपलब्ध माहितीनुसार भारतातील अनेक कंपन्या परदेशी कंपन्यांच्या साथीने या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास उत्सुक असल्याचे समजते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अमेरिका-चीनमधील हे चिप-वॉर आणि त्याला करोनाकाळातील विस्कळीत झालेल्या पुरवठा साखळीची पार्श्वभूमी भारताच्या पथ्यावर पडली आहे. भारतात आयात इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंपैकी ७० ते ८० टक्के वस्तू चीन, हाँगकाँग, सिंगापूर येथून आयात केल्या जातात. देशात सेमीकंडक्टर उद्द्योग मोठ्या स्तरावर उभारला तर पुरवठा साखळीमध्ये चीनला सक्षम पर्याय तयार होईल. त्यामुळेच २०२० नंतर सेमीकंडक्टर उद्योगाला मोठ्या प्रमाणावर चालना देण्याचा प्रयत्न होत आहे. देशात वास्तविक १९६० च्या दशकापासून सेमीकंडक्टर क्षेत्रात बोटावर मोजण्याइतके उद्योग आहेत. मात्र सेमीकंडक्टरनिर्मितीची इकोसिस्टीम म्हणावी तशी तयार झाली नाही. यामध्ये प्रामुख्याने कॉन्टिनेंटल डिव्हाइस इंडिया लिमिटेडची स्थापना, सेमीकंडक्टर कॉम्प्लेक्स लिमिटेडला मान्यता, मोहाली येथील भारतातील पहिल्या सेमीकंडक्टर फॅबची उभारणी, आयआयटी कानपूरच्या प्रभाकर गोएल यांच्या गेट वे डिझाइन ऑटोमेशन यांचा उल्लेख करावा लागेल. भारताचे पहिले सेमीकंडक्टर धोरण २००७ मध्ये जाहीर झाले. मात्र, सेमीकंडक्टर उद्योग बहरण्यात त्याचे रूपांतर फारसे झाले नाही. सेमीकंडक्टर चिपनिर्मिती हे उच्च तंत्रज्ञान आधारित क्षेत्र आहे. त्याच्या निर्मितीमध्ये सिलिकॉन स्लिव्हर हा महत्त्वाचा घटक आहे. संगणकीय आज्ञा हाताळण्यासाठी विद्युत भार नियंत्रण करण्यासाठी त्यात अगणित संख्येत मायक्रोस्कोपिक ट्रान्सिस्टर, काही खनिजे आणि वायू यांच्या विशिष्ट रचना असतात. या चिप विविध आकाराच्या असतात. हे आकार अगदी दोन नॅनोमीटर ते २८, ५६ नॅनोमीटर इतके असतात. ट्रान्सिस्टर लावण्यासाठी सिलिकॉनच्या पट्ट्या असतात त्यांना वेफर्स म्हणतात. या सर्व निर्मिती प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात प्रक्रिया केलेले पाणी आवश्यक असते. सेमीकंडक्टर निर्मितीसाठी मोठी जमीन, उच्च प्रतीचे शुद्ध पाणी, अखंडित वीज, भक्कम पुरवठा साखळी आणि संशोधन आणि विकसनाचे साहाय्य आवश्यक असते. विशेष आर्थिक क्षेत्रे अर्थात एसईझेड यासाठी उपयुक्त ठरू शकतात. या निर्मितीमधून ज्या रासायनिक कचऱ्याची निर्मिती होते, त्याचीही विल्हेवाट लावण्याची दक्षता कंपन्यांना घ्यावी लागते. अन्यथा पर्यावरणाला हानी पोहोचवतील, असे घटक या निर्मितीतून तयार होतात. त्यांची काळजी घेतली पाहिजे. देशात चार वर्षांपूर्वी सेमीकंडक्टर मोहिमेला सुरुवात झाली. तिचे मुख्य उद्दिष्ट देशात सेमीकंडक्टर उद्योगाची इकोसिस्टीम तयार करण्याचे आहे. ७६ हजार कोटी रुपयांची तरतूद त्यासाठी करण्यात आली आहे. देशात पाच सेमीकंडक्टर युनिट्स उभारली जाणार आहेत. 'टाटा ग्रुप' तैवानमधील पॉवर चिप सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशनबरोबर गुजरातमधील धोलेरा येथे प्रकल्प उभारणार आहे. गुजरातमधीलच सानंद येथे दोन आणि आसाममधील मोरिगाव येथे एक चिप पॅकेजिंग युनिट उभारले जाणार आहे. जपानमधील रेनेसास इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन आणि थायलंडमधील 'स्टार्स मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स' कंपन्या गुंतवणूक करणार आहेत. महाराष्ट्रातील पनवेलमध्ये तळोजा एमआयडीसी येथे इस्रायलमधील चिपनिर्मिती टॉवर कंपनी अदानीबरोबर सेमीकंडक्टर प्रकल्प उभारणार आहे. स्मार्टफोन, लॅपटॉप, कॉम्प्युटर, टीव्ही, रेडिओ सेट्स यांसह अनेक इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंमध्ये सेमीकंडक्टर चिप्स लागतात. त्यांची निर्मिती प्रामुख्याने चीन, हाँगकाँग, तैवान, दक्षिण कोरिया, सिंगापूर, जपान आणि अमेरिका या देशांत एकवटली आहे. यातील अमेरिका आणि जपान सोडले, तर उर्वरित देशांतच सेमीकंडक्टर उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. सेमीकंडक्टर निर्मितीत आणि वितरणात चीनचे वर्चस्व लक्षात आल्यानंतर अमेरिकेने आता पावले उचलली आहेत. अत्याधुनिक नॅनोमीटर स्तरावरील चिप्स बनविण्यापासून चीनला रोखण्यासाठी अमेरिकेने चीनवर निर्बंध घातले आहेत. त्याद्वारे चीनला अमेरिकेचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यावर निर्बंध आले आहेत. तरीही चीनचा स्वबळावर चिप निर्मितीचा प्रयत्न कायम आहे. वास्तविक, भारतात सेमीकंडक्टर चिप संशोधन क्षेत्रातील कंपन्या आहेत. पण, त्याआधारे भारतनिर्मिती केंद्र आहे, असे म्हणता येणार नाही. त्यासाठी फाऊंड्री उभ्या राहणे आवश्यक आहे. सर्व प्रकारचे अनुकूल वातावरण, सरकारचा आग्रह हे सर्व जरी असले तरी हे क्षेत्र उच्च तंत्रज्ञान आधारित आहे. ते हाताळण्यासाठीचे कुशल मनुष्यबळ तयार होणे तितकेच गरजेचे आहे आणि तज्ज्ञांच्या मतानुसार त्यासाठी किमान एक ते दीड वर्षाचा कालावधी जाऊ शकतो. निर्मिती प्लांट उभारणीसाठीदेखील तितकाच कालखंड जाऊ शकतो. असेम्ब्ली फाऊंड्रीसह सुटे भाग निर्माण क पुरवठा साखळी उभी राहणेद तितकेच गरजेचे आहे. यासाठी आवश्यक तो वेळ देणे आवश्यक आहे. कुठलेही नवे क्षेत्र आव्हानात्मक असतेच. पण दृढनिश्चय आणि सातत्य यामुळे आव्हानांवर मात करता येते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे वाढवले आर्थिक निकष, अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ

**अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. या योजनेचा जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, यासाठी या योजनेची माहिती देणारा हा लेख**

नवीन सिंचन विहीरीसाठी चार लाख रुपये अनुदान मर्यादा आहे. जुनी विहीर दुरूस्तीसाठी एक लाख रुपये अनुदान मर्यादा आहे. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी अनुदान मर्यादा प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.2 लाख यापैकी जे कमी असेल ते. इनवेल बोअरिंगसाठी चाळीस हजार रुपये अनुदान मर्यादा आहे.वीज जोडणी आकार 20,000 किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते. विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिन (नवीन बाब) साठी 10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचाकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000 यापैकी जे कमी असेल ते. सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000 यापैकी जे कमी असेल ते. एचडीपीई/ पीव्हीसी पाईप (नवीन बाब) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 100% किंवा रू. 50,000 यापैकी जे कमी असेल ते.

सुक्ष्म सिंचन संच मध्ये तुषार सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.47,000/- अनुदान यापैकी जे कमी असेल ती अनुदान मर्यादा आहे. ठिबक सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रू.97,000/- अनुदान यापैकी जे कमी असेल ते. तुषार सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (1) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी 55% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून 10% तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून 15% किंवा रू. 47,000/- यापैकी जे कमी असेल ते (एकूण 90% अनुदान मर्यादेत).ठिबक सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (1) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी 55% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 25% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून 10% तसेच (2) बहू भूधारकांसाठी 45% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून 30% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून 15% किंवा रू. 97,000/- यापैकी जे कमी असेल ते (एकूण 90% अनुदान मर्यादेत). यंत्रसामुग्री (बैलचलित/ ट्रॅक्टर चलित अवजारे)(नवीन बाब) 50,000 रुपये आणि परसबाग (नवीन बाब) 5,000 रुपये असे आहे.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.नवीन विहीरीबाबत रू. 4 लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहीरीची खोली असावी, 12 मीटर खोलीची अट रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम 1993 च्या कलम 3 नुसार अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या 500 मीटर परिसरात नवीन विहिर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या 500 मीटर परिसरात सिंचन विहिर अनुज्ञेय करु नये, यास मान्यता देण्यात आली आहे. दोन सिंचन विहिरींमधील 500 फूट अंतराची अट रद्द करण्यात आली आहे.नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास 20 वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ देण्यात यावा.

शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे या योजनेबरोबरच इतर योजनेंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतक-यांना देखील देण्याची तरतूद अनुज्ञेय करण्यात यावी, यास मान्यता देण्यात आली आहे. लाभार्थ्याकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरीत आवश्यक घटकांचा लाभ विहीत मर्यादेत देण्यास मान्यता देण्यात आली आहे. (उदा. विहीर असल्यास वीज जोडणी, सूक्ष्म सिंचन संच, विहीर व पंपसंच असल्यास सूक्ष्म सिंचन संच इ.) उपरोक्त घटकांचा लाभ घेतल्यानंतरही लाभार्थ्यांने इनवेल बोअरींग व परसबाग या घटकांची मागणी केल्यास विहीत मर्यादेत सदर घटकांचा अतिरिक्त लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण किंवा पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असणाऱ्या लाभार्थ्याची या योजनेंतर्गत एखाद्या घटकासाठी निवड झाल्यास त्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेतून प्राथम्यक्रमाने पंपसंच मंजूर करण्यात येईल.

विशेष घटक योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यास पंपसंच देणे आवश्यक असल्यास, पंपसंचाचा प्रस्ताव, कृषी विकास अधिकारी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची पंपसंचाची योजना राबविणाऱ्या यंत्रणेकडे पाठवून प्राथम्य क्रमाने पंपसंच मंजूर करून घेण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली आहे. लाभार्थ्यास महावितरण कंपनीकडून सोलर पंप मंजूर झाला असेल तर, पंपसंच व वीज जोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु.50,०००) लाभार्थी हिस्सा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या योजनेतून महावितरण कंपनीकडे भरण्यात येईल.

त्याचप्रमाणे या योजनेंतर्गत लाभार्थ्यास अ) नवीन विहीर, आ) जुनी विहीर दुरुस्ती, इ) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देय राहील, यास मान्यता देण्यात आली आहे.

अ) नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/ पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 6,42,००० किंवा रु. 6,92,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर-रु.4,००,०००+ इनवेल बोअरिंग-रु.40,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 6,42,000/ किंवा रु. 6,92,000).

आ) जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 3,42,000/किंवा रु. 3,92,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जूनी विहीर दुरुस्ती-रु.1,00,000+ इनवेल बोअरिंग-रु.40,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. 40,000 किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 3,42,000/ किंवा रु. 3,92,000).

इ) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. 4,02,000/किंवा रु. 4,52,000 एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण – रु.2,00,000 + वीज जोडणी आकार-रु.20,000 + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन-रु. 40,000 किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.50,000 + एचडीपीई/पीव्हीसी पाईप- रु. 50,000 + तुषार सिंचन संच रु. 47,000/ठिबक सिंचन संच रु. 97,000 + यंत्रसामुग्री- रु.50,000+ परसबाग रु.5,000 = रु. 4,02,000/ किंवा रु. 4,52,000).

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी पात्रतेच्या अटी पुढीलप्रमाणे राहतील. लाभार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकरी असला पाहिजे. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याच्या नावे जमिन धारणेचा ७/१२ दाखला, ८-अ चा उतारा असणे आवश्यक आहे. लाभार्थ्याकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. लाभार्थ्याचे बँक खाते असणे व हे बँक खाते आधार कार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे. दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील.

या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१,५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात येत आहे. लाभार्थी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६ हेक्टर एवढी शेत जमीन असणे आवश्यक असेल. मात्र, लाभार्थ्यांची जमीन दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही. एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही.अशाच स्वरुपाच्या कृषी विषयक विकास योजनेकरता विशेष घटक योजनेतून तसेच केंद्र शासनाच्या एससीए (SCA) व घटनेच्या कलम २७५ (A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही. या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

योजनेच्या अधिक माहितीसाठी सबंधित तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

- दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचा प्रेरणादायी प्रवास

कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या बिग बॉस या रिॲलिटी शो चा ग्रँड फिनाले रविवारी रंगला आणि या अपेक्षेप्रमाणे सूरज चव्हाण हा या रिॲलिटी शो चा विजेता ठरला. सूरज चव्हाण या शो चा विजेता ठरावा अशी प्रेक्षकांची ईच्छा होती कारण अल्पावधीतच त्याने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. त्याचा भोळसट स्वभाव आणि निरागस वागणूक यामुळे प्रेक्षक त्याच्या प्रेमात पडले होते. मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार या शो मध्ये त्याचे प्रतिस्पर्धी होते त्यामुळे त्याला कोणीच जमेस धरले नव्हते. टीकटॉक वर स्वतःचे काही सेकंदाचे व्हिडिओ बनवून टाकणारा सूरज चव्हाण हा या शो चा विजेता ठरेल असे सूरज वगळता कोणालाच वाटले नव्हते. सूरजला मात्र स्वतः वर विश्वास होता आणि याच विश्वासाच्या जोरावर तो विजेता ठरला. काहीही करून हा शो जिंकायचाच असा विचार करून तो शो मध्ये उतरला आणि त्याने स्वतः ला सिद्ध केले.



सूरज बिग बॉस चा विजेता ठरला असला तरी त्याचा इतपर्यंत चा प्रवास सोपा नव्हता. बारामती येथे जन्मलेल्या सूरज चव्हाणचे बालपण अतिशय खडतर अवस्थेत गेले. सूरज चव्हाण लहान असतानाच त्याचे आई वडील वारले. लहानपणीच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सूरज चव्हाणचा सांभाळ त्याच्या मोठ्या बहिणीने केला. त्याला एकूण पाच बहिणी आहेत. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने आठवितच सूरजला शाळा सोडून द्यावी लागली. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने एक वेळचे जेवण मिळणे देखील मुश्कील त्यामुळे कित्येकदा तो उपाशी किंवा अर्धपोटीच झोपत असे. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याने मंदिरातील नैवद्य खाऊन दिवस काढले. किशोर वयातच त्याला सोशल मिडियाचे वेड लागले. इतर मुलांसारखे तो ही टिक टॉक या सोशल मीडिया साईट वर स्वतःचे व्हिडिओ काढून टाकू लागला. अल्पावधीतच त्याचे व्हिडिओ लोकप्रिय झाले आणि बघता बघता तो महाराष्ट्रात फेमस झाला तो त्याच्या आगळ्या वेगळ्या शैलीने, त्याचे डायलॉग अक्षरशः वाऱ्या सारखे व्हायरल झाले. गुलिगत धोका, बुक्कित टेंगुळ, झापुक झुपुक, मरीआई पावली या सारखे त्याचे कितीतरी डायलॉग हिट झाले आणि तो टिक टॉक स्टार झाला. टिक टॉक यू ट्यूब कडून त्याला पैसेही मिळाले पण सुरुवातीला त्याच्या भोळ्या स्वभावामुळे ते त्याच्या पर्यंत पोहचले नाही तरीही त्याची काही तक्रार नव्हती. तो त्याचे व्हिडिओ, रिल्स बनवून प्रेक्षकांसमोर येतच होता. त्याची लोकप्रियता वाढतच होती. त्याच्या याच लोकप्रियतेचा फायदा घेण्यासाठी कलर्स मराठी वाहिनीने त्याला बिग बॉस शो ची ऑफर दिली.

सुरुवातीला सूरज बिग बॉसच्या घरात यायला तयार नव्हता. पण कलर्स वाहिनीने त्यांचा हट्ट सोडला नाही अखेर सूरज चव्हाण बिग बॉसच्या घरात यायला तयार झाला आणि आज सूरजने थेट बिग बॉसच्या ट्रॉफी वर नाव कोरत इतिहास घडवला. काही जण त्याच्या या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून म्हणतात की बिग बॉस प्रि प्लॅंड होतं पण तळागाळातील सर्वसामान्य मुलासासाठी कोण प्लॅन करणार ? कोण त्याचा एवढा विचार करणार ? ते पण एवढ्या मोठ्या कसलेल्या कलाकारांसमोर. सूरज चव्हाण त्याच्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर ईथवर पोहचला आहे. आता त्याच्या कष्टाचे चीज झाले असे म्हणावे लागेल. बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचे मनापासून अभिनंदन !!

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### शिवनेरी सुंदरी पेक्षा, महिलांची सुरक्षितता महत्वाची

दि. १५०९. २४ रोजी बस क्र. MH01EE5359 , बस वाहन चालक - PRL69 ०१९१२८ आर एस थोरात , दादर पूर्व - पुणे रेल्वे स्टेशनं दुपारी ११. ४२ ने माझी मुलगी प्रवास करत होती उतरण्याचे ठिकाण वल्लभ नगर बस स्थानक असताना बस वाहन चालक याने बस वल्लभ नगर ला नं थांबवता तुला नाशिक फाटा ला उतरावे लागेल असं सांगून तिला नाशिक फाट्याला उतरवली. वरील नमूद प्रवासात वल्लभ नगर बस स्थानक अधिकृत बस थांबा नोंद असताना मुजोर पणे माझ्या मुलीला नाशिक फाटा येथे उतरवीले गेले. संभंधित व्यवस्थापन यांना ई मेल द्वारे , एक्स द्वारे तक्रार करून सुद्धा अद्याप कारवाई शून्य केली असल्याचे निदर्शनास येत आहे. राज्य परिवहन महामंडळ मुंबई कार्यालय जनसंपर्क अधिकारी यांचाकडे सुद्धा उपरोक्त विषयाबाबत सातत्याने पाठपुरावा केला परंतु मी पुढे पाठवले आहे वाहतूक विभागाला असे सादक बादक संभंधित अधिकारी यांनी दिले. परंतु त्याची एक प्रत मला देण्याबाबत त्यांनी पूर्णतः असमर्थता दर्शविली. मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी हवाई सेवेच्या धर्तीवर आदरातिथ्य व्यवस्थापनाची सेवा देणारी परिचारिका 'शिवनेरी सुंदरी' नेमण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रवाशांच्या तिकिटावर कोणताही अधिभार न लावता प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा देऊन गुणात्मक सेवेचा दर्जा उंचावेल अशी अभिनव योजना भविष्यात सुरू करण्यात येणार आहे असे प्रतिपादन एस.टी. महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष माननीय आमदार श्री.भरतशेठ गोगावले यांनी महामंडळाच्या ३०४ व्या बैठकीमध्ये केली. आदरणीय साहेबाना विशेष विनंती महाराष्ट्रच्या तमाम माता , भगिनी यांच्या वतीने ती अशी की शिवनेरी सुंदरी पेक्षा प्रत्येक महिला प्रवासी सुरक्षित कशी राहील या कडे प्रकर्षाने लक्ष देऊन त्या वर खर्च झाला तर त्याचे नक्कीच स्वागत आहे. जेणेकरून माझ्या मुलीच्या बाबतीत घडलेली पुनरावृत्ती दुसऱ्या कोणा महिले च्या बाबतीत घडणार नाही आणि संबंधित मुजोर वाहनचालक याला योग्य शासन व्हावे हि माफक अपेक्षा नवनिर्वाचित अध्यक्ष साहेब यांच्या कडून..

**- नितीन कदम**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, बुधवार, ९ ऑक्टोबर २०२४

## वायू दलाच्या लढाऊ विमानांची चाचणी लवकरच

**नवी मुंबई :** विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या धावपट्टीवर वायुदलाच्या लढाऊ विमान उड्डाण चाचणीसाठी जोरदार तयारी विमानतळावर सूरू आहे. ११ ऑक्टोबर म्हणजे शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व इतर मंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये ही चाचणी केली जाणार आहे. ही चाचणी प्रत्यक्ष पाहणीसाठी निवडक मान्यवर आणि पत्रकारांना बसण्यासाठी विशेष मंडपाची सोय करण्याचे काम सुरु आहे. सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष विजय सिंघल यांच्याकडे सिडकोची सूत्रे हाती असताना विमानतळाचे काम प्रगतीपथावर आहे. सिडको मंडळाला तीन महत्वाचे प्रकल्प आचारसंहितेपूर्वी मार्गी लावायचे होते. या तीन प्रकल्पांमध्ये २६ हजार महा गृहनिर्माण प्रकल्पाची सोडत, खालापूर येथील इरशाळवाडी येथे आदिवासी बांधवांना घरांचे वाटप आणि सर्वात महत्वाचा प्रकल्प हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन विमानांच्या चाचण्या हे तीन प्रक्लप आहेत. धावपट्टीवरील चाचणीमध्ये हवाई दलाचे सूखोई हे विमान धावपट्टीपासून काही अंतरावर उडणार आहे तसेच अन्य दूस-या विमानाचे प्रत्यक्ष विमानतळाच्या धावपट्टीवर विमान उतरले जाणार आहे.




### महत्त्वाचे

## 'मोक्का' आरोपातील तीन जणांची निर्दोष मुक्तता

**कल्याण :** एका दरोड्याच्या प्रकरणात मानपाडा पोलिसांनी १९ वर्षापूर्वी सहा जणांना महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्याने अटक केली होती. या आरोपींविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध करण्यास तपास यंत्रणा अपयशी ठरली, तसेच पोलिसांनी या गुन्ह्याचा अतिशय ढिसाळपणे तपास केल्याने डोंबिवली परिसरातील तीन जणांची महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी (मोक्का) न्यायालयाचे न्यायाधीश अमित शेटे यांनी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाचा चुकीच्या पध्दतीने, निष्क्रियपध्दतीने तपास करणाऱ्या मानपाडा पोलीस ठाण्यातील तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने ठाणे पोलीस आयुक्तांना दिले आहेत. सेल्वराज सुब्रमण्यम मुदलियार (४५), जयराम अच्छेलाल जैस्वाल (३९), अनिल जसराम चौहान (४८), विजय शंकर सावंत अशी निर्दोष सुटका झालेल्या व्यक्तिंची नावे आहेत. या प्रकरणात अनिल यशवंत म्हात्रे, बबन मधुकर कोट हेही आरोपी होते. पण खटला सुरू असतानाच्या काळात त्यांचे निधन झाले होते. त्यामुळे त्यांच्यावरील खटला बंद करण्यात आला होता.या आरोपींवर संघटित गुन्हेगारी कायद्याने सशस्त्र दरोडा आणि संघटित गुन्हेगारीचे आरोप ठेवण्यात आले होते.ऑगस्ट २००२ मध्ये कल्याण-भिवंडी-नाशिक महामार्गावरील लक्ष्मी हॉटेलमध्ये आरोपींनी सशस्त्र दरोडा टाकून येथील सेवक विजय शिर्केला बेदम मारहाण करून त्याला शस्त्राचा धाक आरोपींनी पैशाची मागणी केली होती. अशा आशयाची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात शिर्के याच्या तक्रारीवरून पोलिसांनी दाखल करून घेतली होती. या प्रकरणात पोलिसांनी सहा आरोपींना अटक करून केलेल्या तपासाच्या आधारे आरोपींवर संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत मोक्का कायदा लावला होता.

# स्थानिकांना काम देण्याच्या मागणीसाठी कोळसा वाहतूक बंद

## लॉरी मालक संघटनेचे आंदोलन

प्रतिनिधी
■ उरण

उरण येथील खाजगी बंदरातून होणाऱ्या कोळसा वाहतुकीचे काम स्थानिक वाहन मालकांना मिळावे या मागणीसाठी मंगळवारी कोळसा वाहतूक बंद करीत आंदोलन सुरू करण्यात आले आहे. जो पर्यंत आपल्या मागण्या मान्य होणार नाहीत तो पर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे मत पनवेल उरण लॉरी मालक संघाचे अध्यक्ष संतोष घरत यांनी व्यक्त केले आहे. तर वाहतूकदार आणि लॉरी मालक संघटना यांच्यात चर्चा होणार आहे. यातून हा प्रश्न सुटेल असा विश्वास उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी व्यक्त केला आहे.



दरम्यान स्थानिक वाहतूकदारांनी आपली वाहने येथील मार्गावर उभी करून हे आंदोलन सुरू केले आहे. कोळशाच्या वाहतूकीचे काम स्थानिकांना देण्यात यावे अशी मागणी करीत स्थानिक उरण पनवेल लॉरी मालक संघाने आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर वाहतुकदारांनी आठवडाभराची मुदत मागितली होती. ही मुदत संपल्या नंतर सोमवारी उरण पोलीस वाहतूकदार आणि स्थानिक लॉरी यांच्यात चर्चा झाली मात्र या चर्चेतून समाधानकारक तोडगा न निघाल्याने अखेर आंदोलनाला सुरुवात झाली आहे. या आंदोलनाला उरण पनवेल तालुक्यातील शेकडो स्थानिक वाहन चालकांनी पाठिंबा दिला आहे. यात रमण घरत,डॉ. मनीष पाटील,नरेश घरत,रवी घरत,रमाकांत घरत तसेच विविध पक्षाच्या नेत्यांनी ही पाठिंबा दिला आहे. उरण येथील एका बंदरातील कंपनीतून कोळशाची वाहतूक केली जाते.दररोज या कंपनीतुन २२५-२५० अवजड वाहतुन हजारो टन कोळशाची वाहतूक केली जाते.मात्र कोळसा वाहतुकीचे काम स्थानिक वाहतूकदारांना डावलून करण्यात येत आहे. वाहतुकीचे काम स्थानिक वाहतूकदारांनाच देण्यात यावे या मागणीसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

# पीएम किसान योजनेत ऑनलाईन फसवणूक

प्रतिनिधी
■ ठाणे

पंतप्रधान नरेंद्र मोदी किसान योजनेचे ई – केवायसी करा, असे सांगत फसवणुकीच्या घटना घडल्याचे समोर आल्या आहेत. गेल्या काही काळात बहुतांश भागामध्ये हे प्रकार वाढले असून सायबर गुन्हे शाखेसमोर एक मोठे आव्हान उभे आहे. तसेच, शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यानंतर अधिकचा परतावा देण्याच्या नावाखालीही फसवणूक होत असल्याचे समोर आले.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत ऑनलाईन फसवणुकीचे 407 गुन्हे दाखल झाले आहेत. सायबर गुन्हेगारी रोखून आरोपींना अटक करणे, हे ठाणे पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन गंडा घालण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली. अगदी उच्च शिक्षितही यामध्ये भरकटले गेले आहेत. ऑनलाईन व्यवहार करताना काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये जानेवारी ते ऑगस्ट या 8 महिन्यांत ऑनलाईन फसवणुकीचे 407 गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये शेअर मार्केटमध्ये अधिकचा नफा देण्याच्या 433 तक्रारी, प्रोफाइल हॅकिंगच्या 366, नोकरीमधील फसवणुकीच्या 84 तक्रारी आल्याची माहिती समोर आली आहे.





आर्थिक गुन्हे शाखेचे उपायुक्त पराग मणेरे म्हणाले की, "शासनाच्या नावाने असलेल्या योजनांमध्ये कोणत्याही व्यक्तीला पैसे देऊ नका. आपल्या बँक खात्याची माहिती किंवा ओटीपी कोणालाही शेअर करु नका. अशा प्रकारे फसवणूक होऊ नये म्हणून फेसबुक खात्यावरील फ्रेंड लिस्ट हाईड करून ठेवा. तसेच त्याचा पासवर्ड हा 8 अक्षरी असावा, ज्यामध्ये अंकांचा ही समावेश असावा. कोणीही ब्लॅकमेल करु नये म्हणून प्रोफाइल लॉक करून ठेवावे," असे आवाहन केले आहे. "सायबर गुन्हेगारीचा आलेख वाढू लागला असून फसवणुकीचे आकडे हजारांपासून आता कोटींच्या घरात गेले आहेत. परदेशातून ही सायबर गुन्हेगारांची टोळी नागरिकांच्या बँक खात्यावर डल्ला मारत असून कोणीही अशा अनोळखी फोन, मेसेजला प्रतिसाद देऊ नये. तसेच, आपल्या खात्याची माहिती किंवा ओटीपी कोणालाही शेअर करु नका," असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

# डोंबिवलीत नवरात्रोत्सवात 'शेतकरी ते थेट ग्राहक' पेठेचे आयोजन

प्रतिनिधी
■ डोंबिवली

शेतात पिकवलेला शेतमाल कोणत्याही दलालाच्या मध्यस्थीशिवाय स्वस्त दरामध्ये थेट ग्राहकापर्यंत पोहचावा आणि शेतकरी बांधवांना त्यातून जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने नवरात्रोत्सव निमित्ताने 'शेतकरी ते थेट ग्राहक' पेठेचे आयोजन ६ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२४ दरम्यान संध्याकाळी ४ ते रात्री ९ या वेळेत डोंबिवली पूर्व येथील नेहरू मैदान येथे आयोजन करण्यात आले आहे

शेतात पिकविलेला भाजीपाला, फळफळावळ, धान्य, कडधान्य, सेंद्रिय व गावरान भाजीपाला कोणत्याही दलालाच्या मध्यस्थीशिवाय थेट ग्राहकांपर्यंत स्वस्त दरामध्ये पोहचावा आणि शेतकरी बांधवांना त्यातून जास्तीत जास्त फायदा व्हावा हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेऊन सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने, कृषी विभाग आत्मा व कृषी पणन पुरस्कृत आणि डोंबिवलीकर प्रतिष्ठान व विंग्रो मार्केट यांच्या संयुक्त विद्यमाने 'शेतकरी ते थेट ग्राहक' पेठेचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते या ग्राहक पेठेचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर येणाऱ्या प्रत्येक रविवारी ही ग्राहक पेठ डोंबिवलीतील वेगवेगळ्या महापालिका मैदानांवर आयोजित केली जाणार आहे. याबद्दल अधिक माहिती सांगताना मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले की, "शेतकऱ्यांसाठी ग्राहक पेठ आयोजित करण्याचे उद्दिष्ट ठेऊन त्यासाठी डोंबिवली महापालिकेचे सर्व मैदाने उपलब्ध व्हावीत यासाठी महापालिका आयुक्तांशी मागील काही दिवसांपासून चर्चा करत होतो. या चर्चेमध्ये आयुक्तांनी एक चांगला निर्णय घेतल्यामुळे डोंबिवली येथील डोंबिवली येथील नेहरू मैदानात आम्ही 'शेतकरी ते थेट ग्राहक' पेठ सुरु करत आहोत. या ग्राहक पेठेच्या माध्यमातून शेतात पिकवलेला शेतमाल व भाजीपाला ग्राहकांना चांगल्या पद्धतीने व स्वस्त दरामध्ये ग्राहकांना मिळतो आणि कोणत्याही दलालाची मध्यस्थी नसल्यामुळे शेतकऱ्याला सुद्धा या व्यवहारातून जास्तीत जास्त फायदा होतो. देशातील बळीराजा शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट झाले पाहिजे आणि ग्राहक व शेतकरी यांच्यामध्ये जे दलाल आहेत ते कायमचे निघून गेले पाहिजेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे स्वप्न आहे. ते स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही हे पाऊल उचलले आहे.

# डोंबिवलीत 'नमो रमो नवरात्री' गरबा

## गरबा क्वीन गीताबेन रबारी आणि सुप्रसिध्द गायक निलेश गढवी आणतात रंगात

प्रतिनिधी
■ डोंबिवली

मुंबई आणि महाराष्ट्रात डोंबिवलीचा "नमो रमो गरबा" आता फार प्रसिद्ध झाला आहे. सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष "नमो रमो नवरात्री" या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही तिथे साजरा होतो त्यात जगप्रसिद्ध गरबा कलाकार येण्यास उत्सुक असतात. यंदा गरबा क्वीन या विशेषणाने संबोधली जाणारी गीताबेन रबारी पुन्हा एकदा नवरात्रीचे नऊ दिवस आपल्या "नमो रमो नवरात्रीचा" उत्सव रंगतदार करण्यास येत आहे सोबत ख्यातनाम गरबा गायक निलेश गढवी यांची साथ त्यांना लाभणार आहे.

"नमो रमो नवरात्रीची" संकल्पना रुजवणारे आणि सर्व संस्थांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहणारे डोंबिवलीचे आमदार आणि महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्यामुळेच हा नवरात्री उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. दररोज सकाळ व संध्याकाळ विधिवत पूजा आरती करून महिषासुर मर्दिनीचा गजर करून देवीला नैवेद्य वाढून आवाहन केलं जातं आणि रात्री भव्य मंडपात देवीसमोर गरबा खेळला जातो. केवळ कल्याण डोंबिवलीच नाही तर मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल रायगड, पालघर तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून गरबा खेळण्यासाठी पारंपारिक वेशभूषेत गरबा प्रेमी अवघी तरुणाई या "नमो रमो नवरात्रीत" उत्साहात सहभागी होतात. "नमो रमो नवरात्रीच्या" स्थळाचं पावित्र्य तिथे मंडपातच उभारलेल्या अंबे मातेच्या मंदिरात आहे. आणि



यंदाचं अजून एक प्रमुख आकर्षण म्हणजे मातेच्या या मंदिरात दररोज नव्या नव्या रंगांच्या ताज्या नैसर्गिक फुलांची सजावट करण्यात येते. ख्यातनाम पुष्परचनाकार श्याम भगत यांच्यातर्फे ही सजावट केली जात आहे.

सालाबादप्रमाणे या वर्षीही सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक संजय धबडे ह्यांनी भव्य सेट उभारला आहे. तसेच यावर्षी पूर्ण वातानुकूलित ७० हजार स्क्वेअर फूट जागेमध्ये स्वस्तिक इव्हेंट्सचे अनिल पासड ह्यांनी १३५ फूट बाय ५०० फूट अशा भव्य एसी डोमची निर्मिती केली आहे. या उत्सवामध्ये फक्त गुजराथी समाज नव्हे तर सर्व जाती आणि धर्माचे लोक मोठ्या संख्येने उत्साहाने सहभागी होतात, अशी माहिती आमदार व मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली.

# दोन आयुष्यमान आरोग्य मंदिर व डायग्नोस्टिक सेंटरचं लोकार्पण

■ भाईंदर

8 ऑक्टबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मुंशी कंपाऊंड व खारीगाव येथील आयुष्मान आरोग्य मंदिर तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग व क्रस्ना डायग्नोस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप तत्त्वावर तयार करण्यात आलेले डायग्नोस्टिक सेंटरचा लोकार्पण सोहळा मा. आमदार श्रीमती गीता जैन व मा.मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

शहरी भागातील अतिशय दाटीवाटी असलेल्या भागांपासून तसेच झोपटपट्टी पासून नागरी आरोग्य मंदिराचे (UPHC) अंतर जास्त असल्यामुळे काही भागातील नागरिक आरोग्य सेवांपासून वंचित राहू नये त्याकरीता सातत्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी, विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निदान व उपचार करण्यासाठी तसेच सुलभ व परवडणारी उत्तम दर्जाची आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी दर 15000 ते 20000 लोकसंख्येकरीता एका नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिराची (Urban Health Wellness Center) स्थापना करण्यात आली आहे. सदर आरोग्य मंदिरात वैद्यकीय अधिकारी (MBBS), परिचारिका, बहुउद्देशीय कर्मचारी, सुरक्षा रक्षक, हाऊस किपिंग स्टाफ इतके मनुष्यबळ पुरवण्यात येणार आहे. त्याचबरोबर सदर केंद्रामध्ये बाह्य रुग्ण सेवा, मोफत औषधोपचार, मोफत प्रयोगशाळा तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी व लसीकरण या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच इंदिरा गांधी रुग्णालय येथील Public Private Partnership (PPP) तत्त्वावरील क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रेडिओलॉजी, सोनोग्राफी, एक्स रे मशीन, एम.आर.आय, पॅथॉलॉजी लॅब व इतर वैद्यकीय तपासण्या या सुविधा मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे देण्यात येणार आहेत .

# भीषण आगीत दूध डेअरीतील साहित्य खाक

प्रतिनिधी
■ दिवा

दिवा शहरातील साबे रोड जवळ असलेल्या १० बाय १५ फूट आकाराच्या गाळयामध्ये कैलास चंद्रकुमार यांची दूध डेअरी आहे. या डेअरी मध्ये मंगळवारी मध्यरात्री पावणेदोन वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. याबाबतची माहिती मिळताच मुंब्रा पोलीस ठाण्यातील कर्मचारी, वीज वितरण करणाऱ्या कंपनीचे



कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी १ फायर ,१ रेस्क्यू वाहन आणि १ वॉटर टँकरच्या मदतीने दोन तासांच्या अथक प्रयत्नानी मध्यरात्री पावणेचार वाजण्याच्या सुमारास आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. परंतु डेअरी मधील दुध ठेवण्याचे दोन मोठे आणि एक लहान फ्रिज तसेच इतर साहित्य जळून खाक झाल्याची माहिती ठामपाच्या अप्तकालिन कक्षातील अधिका-यांनी दिली.

# फाऊंटन ते गायमुख 60 मीटर रुंद रस्त्याच्या कामास मंजुरी

## एमएमआरडीएचा टेंडर प्रक्रिया सुरु करण्याचा मार्ग मोकळा ; आमदार प्रताप सरनाईक यांचा पाठपुरावा यशस्वी

प्रतिनिधी
■ भाईंदर

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर व प्रारुप विकास योजनेतील फाऊंटन ते गायमुख हा प्रस्तावित ३०.०० मी, रुंद रस्ता ६०.०० मी. रुंद करणेबाबत महाराष्ट्र राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने काल मंजुरी दिली आहे. याबाबत त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले असून एमएमआरडीए आता टेंडर प्रक्रिया सुरु करणार असून आचारसंहिता संपल्यानंतर या रस्त्याचे काम सुरु केले जाणार आहे , अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली.

वाहनांची वाढती प्रचंड संख्या , होणारी तीव्र वाहतूक कोंडी आणि मेट्रोचे काम सुरु करण्यासाठी हे रस्ता रुंदीकरण करणे खूप आवश्यक आहे. 'फाउंटन हॉटेल ते गायमुख' पर्यंत भविष्याचा विचार करून रस्ता दुप्पट म्हणजेच ६० मीटर रुंद करण्याची मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी वेळोवेळी केली होती व ही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य करून या रस्ता रुंदीकरणाच्या कामास काही महिन्यांपूर्वी मंजुरी दिली. आता नगरविकास विभागाने त्यास अधिकृत मान्यता दिली आहे. या रुंदीकरणाच्या खर्चाचे अंदाजपत्रकही एमएमआरडीए अधिकाऱ्यांनी तयार केले आहे. एम एम आर डी एच्या माध्यमातून हा रस्ता विकसित केला जाणार आहे.

आमदार सरनाईक यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हे काम मार्गी लागले. MMRDA चे महानगर आयुक्त संजय मुखर्जी व आमदार सरनाईक यांच्यात या रस्त्याच्या कामाबाबत सर्व अधिकारी वर्गासह तीन वेळा बैठका झाल्या आणि कामाला गती आली.

"मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये फाऊंटन ते गायमुख या दरम्यानच्या ३०.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतुदीनुसार ६०.०० मी. रुंद मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविण्याची कार्यवाही आयुक्त, महानगरपालिका यांनी त्वरित करावी" असे आदेश राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने दिले आहेत. म्हणजे राज्य सरकारने मंजुरी दिली असल्याने टेंडर प्रक्रिया सुरु करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे असे आमदार सरनाईक म्हणाले.

२ वर्षात ६० मीटर रस्ता तयार होणार राज्य सरकारच्या अंतिम मंजुरीनंतर आता टेंडर प्रक्रिया आचार संहिता काळात पूर्ण केली जाईल. टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली व आचार संहिता संपली की या रस्त्याचे काम सुरु केले जाईल. साधारण दोन वर्षाच्या कालावधीमध्ये या रस्त्याचे काम केले जाईल , असे आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. हा रुंद रस्ता झाल्याने वाहतूक कोंडीची कायमची डोकेदुखी दूर होणार आहे.

आदिवासींना समृद्धी मोबदला द्या हे ६० मीटर रस्ता रुंदीकरण काम सुरु करत असताना सध्याच्या ३० मीटर रस्त्याच्या दोन्ही बाजूस १५-१५ मीटर जागेत रस्ता वाढवावा. त्यात आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी जातात. हे आदिवासी शेती करून उदरनिर्वाह करतात.


## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
### बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्र. ०५

**ई- निविदा सुचना क्र. १०६ सन २०२४- २५ प्रसिद्ध करणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील खालील काम वर्तमान पत्रात प्रसिद्ध करणे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिति क्रवॉर्ड क्र 05. ०५ निजामपुरा, चांद तारा मस्जिद मुर्गी मोहल्ला येथील रस्ता नव्याने डांबरीकरण करून रस्ता दुरुस्ती करणे | १९,९९,६३६ |

सबब कामाची ई निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in दि. ९ / १० /२०२४ ते दि. १६/ १० /२०२४ रोजी पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थळावर दि. १७/१०/२०२४ रोजी दु. ४.०० वाजे पर्यंत स्विकारण्यांत येतील.

जा.क्र. /ज.सं.वि./१४११
दिनांक : ०८/१०/२०२४

सही/-
प्र. शहर अभियंता
भिवंडी नि.श. महानगरपालिका, भिवंडी

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना क्र. १२७/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता [पश्चिम विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन / सिपीडब्लूडी/एमएस/मुंबई महानगरपालिका /सिडको रेल्वे / बीपीटी / एमआयडीसी / एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ६ कामांकरीता बी- १ ( Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

कालावधीकामांची यादी कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०९/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १६/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १७/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघणयाचा दिनांक | १८/२०/२०२४सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप : २. निविदा सुचनेबाबत शुद्धिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

Follow us:@mhadaofficial

CPRO/A/933

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**कस्तुरबा हॉस्पिटल**
**साने गुरुजी मार्ग, मुंबई ४०००११**

क्र. एचओ /६०९८/ केएच — दि. ०७/१०/२०२४

**ई-निविदा सूचना**

बृमनपाचे महानगरपालिका आयुक्तांसाठी आणि त्यांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक कस्तुरबा हॉस्पिटलद्वारे खाली नमूद करण्यात कामासाठी ऑन लाईन ई-निविदा मागवित आहेत.

| अनु. क्र. | बोली क्र. | प्रकाराचे नाव | परिमाण |
|---|---|---|---|
| १. | २०२४_एमसीजीएम_११०६२०१_१ | कस्तुरबा हॉस्पिटल येथे पीसीआर पथोलॉजी लबोरेटरी करीता एचडीसी – लायट प्लस – एलआर (३० नग) खरेदीकरिता ई-निविदा | परिमाण देयकानुसार (बीओक्यू) |

**बोली सुरु:** ०९.१०.२०२४ रोजी १०:०० वा.
**बोली समाप्ती:** १५.१०.२०२४ रोजी १६:०० वा.
**संपर्क अधिकारी:** डॉ. चंद्रकांत पी. पवार, वैद्यकीय अधीक्षक, कस्तुरबा हॉस्पिटल
दूर क्र. ०२२-२३०२७७६९
**ई-मेल:** ms01kasturba.phd@mcgm.gov.in
बोली योग्य प्रक्रियेने सादर ऑनलाईन सादर कराव्यात.
पूर्ण ई-निविदा कागदपत्रे महाटेंडर पोर्टल **http://portal.mcgm.gov.in** वर उपलब्ध आहे.

पीआरओ/१६०९/जाही/२०२४-२५

सही/-
वैद्यकीय अधीक्षक,
कस्तुरबा हॉस्पिटल

कोणताही ताप असू शकतो हिवताप.

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. १२५ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई शेपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रका प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) म्हाडा व सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे नोंदणीकृत पात्र मुंबई उपनगर मधील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना एकुण २ कामाकरीता बी - १ ( Item Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०९/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १६/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १७/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | "आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | १८/२०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप : २. निविदा सुचनेबाबत शुद्धिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

Follow us:@mhadaofficial

CPRO/A/927

सही/-
कार्यकारी अभियंता (प).
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## पुण्यात 10 ऑक्टोबरला जनआक्रोश मोर्चा

**पुणे :** राज्यात महिलावरील अत्याचार राजरोसपणे चालू आहेत ,दलित समाजावर गावगावात आत्याचार होत आहेत. राज्यात कायदाचा धाक अजिबात राहिला नाही. या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी मातंग एकता आंदोलनाच्यावतीने पुण्यात 10 ऑक्टोबर 2024 रोजी पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मातंग एकता आंदोलनाचे प्रदेश कार्याध्यक्ष अविनाश बागवे यांनी दिली. या मोर्चाचे नेतृत्त्व मातंग एकता आंदोलनाचे संस्थापक व माजी मंत्री रमेश बागवे करणार आहेत. या मोर्चात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून शेकडो लोक सहभागी होणार आहेत. पत्रकार परिषदेस मातंग एकता आंदोलनाच्या पुणे अध्यक्षा राजश्री अडसूळ, मातंग एकता आंदोलांचे विठ्ठल थोरात उपस्थित होते.




# माजी मंत्री मधुकर पिचडांविरोधात केस दाखल

## बोगस आदिवासी दाखले तयार करुन सुनेचे 5 कोटी रुपये हडपल्याचा आरोप

**प्रतिनिधी**

■ **पुणे**

महाराष्ट्राचे माजी कॅबिनेट मंत्री मधुकरराव पिचड यांनी त्यांच्या द्वितीय पत्नी कमळ मधुकर पिचड या आदिवासी नसताना त्यांचा खोटा व बनावट आदिवासी जातीचा दाखला बनून त्याआधारे आमच्या पक्षकार सून सरोज जितेंद्र पिचड यांची संपत्ती हडप करून फसवणूक केली आहे. त्यांची दुसरी पत्नी कमळ पिचड या हिंदू मराठा असताना मधुकर पिचड यांनी बनावट कागदपत्रे तयार करून घेतली, त्याचवेळी सून सरोज जितेंद्र पिचड यांच्या जबरीने अनेक कागदपत्रांवर सह्या आणि स्वतःच्या ओळखींचा फायदा घेऊन सरकारी रेकॉर्डमध्ये फेरफार करून घेतले. बोगस आदिवासी दाखले तयार करून सुनेचे 5 कोटी रुपये त्यांनी हडप केले, असा आरोप ॲड. असीम सरोदे यांनी पत्रकार परिषदेत केला.



सरोदे म्हणाले, बनावट आदिवासी दाखल्याच्या आधारे कमळ पिचड यांच्या नावाने जमिनी फेरफर करून घेतल्या. त्या सर्व जमीन मिळकती समृद्धी महामार्गात विक्री करून त्याद्वारे शासनाकडून साधारणतः पाच कोटी रुपये घेतले आहेत, हे पाच कोटी रुपये त्यांची सून सरोज पिचड हिला मिळणे आवश्यक होते. तसेच त्याव्यतिरिक्त अन्य शेतकऱ्यांचे देखील मिळकती अशाच प्रकारे बेकायदेशीर बळकावून त्यातून देखील कोट्यवधी रुपये मिळविले आहे. त्याबाबत सहआयुक्त अनुसूचित जाती जमाती तपासणी समितीकडे 2018 सालापासून तक्रारी आहेत. पण सरकारी अधिकारी मधुकर पिचड यांच्या दबवाखाली वागतात.

या सर्वांबाबत सरोज जितेंद्र पिचड यांनी पोलीस निरीक्षक शहापूर यांच्याकडे रीतसर तक्रार देऊन देखील पोलिसांनी त्याची दखल न घेतल्याने आम्ही जिल्हा व सत्र न्यायालय कल्याण येथे खासगी तक्रार दाखल केलेली आहे. सदर केस कोर्टाने दखल घेऊन मधुकर पिचड, कमळ पिचड व संबंधितांवर कारवाई का केली जाऊ नये, याबाबतची नोटीस बजावणीचा आदेश दिलेले आहे. सदर प्रकरणाची पुढील तारीख 25 ऑक्टोबर रोजी आहे. अशा प्रकारे कमळ पिचड यांनी आदिवासी नसताना आदिवासी जमिनी बेकायदेशीर बळकवून त्यातून कोट्यवधी रुपयांचा नफा मिळविला आहे त्यास मधुकर पिचड यांचे राजकीय पाठबळ असून ते सध्या सत्ताधारी भाजपमध्ये असल्याने त्यांच्यावर पोलिस कारवाई करत नाही.

मधुकर पिचड व इतरांविरोधात त्यांची सून सरोज पिचड यांनी कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार सुद्धा केस दाखल केलेली आहे, अशी माहिती ॲड. असीम सरोदे यांनी दिली आहे.

# बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील घटनास्थळाची शरद पवार व सुप्रिया सुळेंनी केली पाहणी

**प्रतिनिधी**

■ **पुणे**

काही दिवसांपुर्वी पुण्याजवळ असलेल्या बोपदेव घाट परिसरात एका 21 वर्षीय तरूणीवर सामूहिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली होती, अद्याप या घटनेतील आरोपींचा शोध पोलिस घेत आहेत. मात्र, या घटनेने नागरिकांनी, राजकीय नेत्यांनी, अभिनय क्षेत्रातील व्यक्तींनी देखील प्रतिक्रिया दिली होती, या घटनेतील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची वेगवेगळी पथकं काम करत आहेत, यातील दोन आरोपीचे स्केच देखील पोलिसांनी शेअर केले आहेत, तर आरोपींबाबत काही माहिती असेल तर ती कळवल्यास त्यांना इनाम देण्यात येईल अशी घोषणा देखील पोलिसांनी केली आहे, या परिसरात सीसीटीव्ही नसल्याने आरोपींना शोधण्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. ही घटना घडली त्याठिकाणी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह कार्याध्यक्षा आणि बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पाहणी केली आहे.



शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी कोंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बोपेदेव घाट परिसरात ज्या ठिकाणी पाच दिवसांपूर्वी 21 वर्षीय एका तरुणीवर सामूहिक अत्याचाराची घटना घडली होती. त्या घटनास्थळाची पाहणी केली आणि त्याचबरोबर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासाची माहिती घेतली. पाच दिवस उलटूनही आतापर्यंत आरोपीपर्यंत पोलिसांना का पोहोचता आलेलं नाही असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे. तपासात काय अडचणी येतात याबाबत देखील पवारांनी बड्या अधिकाऱ्यांना विचारलं. त्याचबरोबर या प्रकरणातील माहिती देखील जाणून घेतली. पुण्यात महिला ,मुली सुरक्षित आहे का? असा सवाल देखील त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

# समाज हितासाठी लेखन आवश्यक - डॉ. सुषमा चौगले

## हैद्राबाद येथे हिंदी नवलेखक शिबिरात मार्गदर्शन

**प्रतिनिधी**

■ **कोल्हापूर**

'लेखनासाठी अनुभवांसोबत संवेदनशील विचारांनी समाजाच्या व देशाच्या प्रत्येक घटनेकडे तटस्थपणे पाहून, अभ्यासून समाज हितासाठी लेखन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठच्या हिंदी विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुषमा मारुती चौगले यांनी केले.

हैराबाद येथे केंद्रीय हिंदी निदेशालय, उच्च शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व केंद्रीय हिंदी संस्थान, हैदराबाद केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "हिंदीतरभाषी हिंदी नवलेखक शिबिर" आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. सूषमा चौगले बोलत होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन हैद्राबाद येथील उच्च शिक्षा व शोध संस्थान दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेचे पूर्व विभागाध्यक्ष, डॉ. ऋषभदेव शर्मा, केंद्रीय हिंदी संस्थान हैदराबाद केंद्र चे क्षत्रिय निदेशक प्रा. गंगाधर वानोडे , केंद्रीय हिंदी निदेशालय नवी दिल्लीच्या सहाय्यक निदेशक डॉ.



कृती शर्मा, केंद्रीय हिंदी संस्थान हैदराबाद केंद्र सहा-आचार्य डॉ. फत्ताराम नायक, तेजपूर विश्वविद्यालय, आसामचे हिंदी विभागाध्यक्ष डॉ. प्रमोद मीना , केंद्रीय हिंदी निदेशालय नवी दिल्ली चे डॉ. प्रदीप कुमार तसेच कोल्हापूरच्या डॉ. सुषमा चौगले यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाद्वारे करण्यात आले.

या नवलेखक शिबिरामध्ये ११ महिला तसेच ९ पुरुष असे एकूण २० नवलेखक महाराष्ट्र, गुजरात , राजस्थान, केरळ , आंध्र प्रदेश, पांडिचेरी मधून सहभागी झाले होते. महावीर महाविद्यालय, कोल्हापूर च्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत प्रस्तुत केले. कार्यक्रमाची अध्यक्षता केंद्रीय हिंदी निदेशालय ,नवी दिल्ली चे निदेशक प्रो. सुनील बाबुराव कुलकर्णी यांनी दर्शविताना हिंदी साहित्य लेखनाचा आग्रह केला, तसेच साहित्य लेखनाच्या विविध विधांची ओळख करून दिली. प्रो. वृषभदेव शर्मा यांनी सर्जनात्मक लेखन प्रक्रिया कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केले.

# कृषीविषयक संशोधन अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत -उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**प्रतिनिधी**

■ **बारामती**

शेतकऱ्यांच्या उत्पनात वाढ होऊन त्यांच्या शेतमालाला योग्य प्रकारे भाव मिळण्यासोबतच नैसर्गिक आपत्तीच्या काळात पिकांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता कृषी विषयक संशोधन अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.



कृषी विकास ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र माळेगाव येथे 'रोटरी क्लब'च्यावतीने आयोजित 'ग्रीन गोल्ड' दोन दिवसीय शेतकरी प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या शिबीरास पालघर, ठाणे, पुणे येथील शेतकरी उपस्थित होते. त्याचबरोबर रोटरीच्या प्रकल्प संचालक मनीषा कोंडसकर, विभागीय व्यवस्थापक रश्मी कुलकर्णी, प्रतीक्षा माई, वृषाली खिरे, डॉ. संजीव जैन, डॉ. सुनीता जैन आदी उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, केंद्र व राज्य शासनाच्यावतीने शेतकरी कल्याणाच्या वीज देयकात माफी, महिलांना कृषी विषयक बाजारपेठेत स्थान मिळण्याकरीता लखपती दीदी योजना आदी योजना राबविण्यात येत आहे. त्याकरीता पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कृषी विभाग, ॲग्रोवन, कृषी विषयावर काम करणाऱ्या संघटनेच्यामार्फत या योजनांबाबत जनजागृती केली जात आहे. शासनाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी आठवडी बाजारामुळे शेतकरी ग्राहकाला थेट शेतमाल विक्री करता येते. शेतकरी आठवडी बाजारापेठेत पूर्व मागणी (प्री-आर्डर) घेण्याबाबत विचार करण्यात यावा. क्षेत्रनिहाय पीकपद्धती घेण्याबाबत नियोजन केले असून त्या त्या भागातील शेतकऱ्यांनी आपल्या भागाचा विचार करुन पिके घ्यावीत, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी कृषी विज्ञान केंद्रात करण्यात येणारे विविध संशोधन, प्रकल्प, कलमे, रोपे, प्रशिक्षण, अन्न प्रकिया केंद्र आदीबाबत माहिती जाणून घेतली.

# अरबी समुद्र किनारी रत्नागिरीत उभारला देशातील पहिला शिवपुतळा

**प्रतिनिधी**

■ **रत्नागिरी**

ढोल, ताशे, तुतारीचा निनाद, फटक्यांची आतषबाजी आणि महाराजांच्या जयघोषात, अरबी समुद्राच्या बाजूला असणाऱ्या देशातील पहिल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सोमवारी लोकार्पण करण्यात आले. रत्नागिरीतील रत्नदुर्ग किल्ल्यावर साकारण्यात आलेल्या शिवसृष्टीत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे.



या लोकार्पण सोहळयावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, अपर जिल्हाधिकारी शंकर बर्गे, मुख्याधिकारी तुषार बाबर, राजन शेट्ये, बिपीन बंदरकर उपस्थित होते. मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सुरुवातीला फित कापून आणि कोनशिलेचे अनावरण करुन रत्नदुर्ग शिवसृष्टीचे लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्टॅचू गॅलरीची पाहणी केली. तेथून कळ दाबून समोर उभ्या असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले. शिवपुतळ्याचे लोकार्पण होताच उपस्थितांनी एकच जयघोष केला. यावेळी डोळ्याचे पारणे फेडणारी नेत्रदीपक फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

यावेळी मंत्री सामंत म्हणाले की, कोकणातील सर्वात मोठ्या असणाऱ्या या शिवसृष्टीचे लोकार्पण करताना मला मनस्वी आनंद होत आहे. दोन महिन्यात ही परिपूर्ण शिवसृष्टी पहायला मिळेल. अरबी समुद्राच्या बाजूला देशातला सर्वात मोठा छत्रपती शिवाजी महाराजांचा हा उभा पुतळा आहे. जे जे स्कूल ऑफ ऑर्टच्या पथकाला मनापासून धन्यवाद देतो, असेही ते म्हणाले.

## 'खंडोबा' परिसरात उभारणार रोपवे

■ **पुणे**

खेड तालुक्यातील मौजे निमगाव येथील निमगाव खंडोबा मंदीर देवस्थान परिसराचा रोपवे व अन्य पायाभूत सुविधांच्या निर्मितीद्वारे विकास करण्यात येणार आहेत. त्यामुळे तेथील आध्यात्मिक, तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना मिळणार आहे. त्यासाठी परिसरातली सुमारे शंभर कोटी रुपये किमतीची 24 एकर शासकीय गायरान जमीन जिल्हा परीषदेकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यासंबंधीचा शासननिर्णयही आज जारी करण्यात आला. राज्यातील आणि राज्याबाहेर भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या निमगाव खंडोबा देवस्थानाच्या विकासासाठी पालकमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्याच्या महसूल व वन विभागाने आज दि. 8 ऑक्टोबर 2024 रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार मौजे निमगाव येथील गट क्रमांक 135 मधील 14 हे. 40 आर. गायरान आणि शासकीय जमीन रोपवे व सार्वजनिक सुविधांच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदेकडे मोफत वर्ग करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रात होणार आशियातील सर्वात मोठा माल्ट डिस्टिलरी प्रकल्प

## उपमुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते भूमिपूजन

**प्रतिनिधी**

■ **नागपूर**

आशियातील सर्वात मोठ्या पर्नोड रिकार्ड इंडियाच्या माल्ट डिस्टिलरी प्रकल्पाचे भूमिपूजन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी बुटीबोरी, नागपूर येथे झाले. यावेळी पर्नोड रिकार्ड इंडियाचे सीईओ जॉ टूबूल यावेळी उपस्थित होते. कंपनीने २३ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारसोबत केलेल्या सामंजस्य कराराची पूर्तता करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. हा ऐतिहासिक सामंजस्य करार १० वर्षांच्या कालावधीत अंदाजे १७८५ कोटी रुपयांपर्यंतच्या गुंतवणुकीद्वारे समर्थित, पर्नोड रिकार्डची भारताप्रती असलेली वचनबद्धता अधोरेखित करतो. पर्नोड रिकार्ड इंडिया ही स्पिरिट्स आणि वाईन उद्योगातील जागतिक स्तरावरील अग्रेसर कंपनी आहे.



या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्यापासून, पर्नोड रिकार्ड इंडियाने या प्रकल्पाला पुढे नेण्यासाठी जमिनीच्या खर्चासह सुमारे १००कोटी रुपये गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले आहे. कंपनीने ऑपरेशनल आणि बांधकाम नियोजनात उल्लेखनीय प्रगती केली आहे. या सुविधेचे डिझाइन आणि लेआउट तयार झाले आहे. हे प्रयत्न सामंजस्य करारामध्ये नमूद केलेल्या उद्दिष्टांशी सुसंगत आहेत. भारतात जागतिक दर्जाच्या माल्ट स्पिरीटच्या उत्पादनासाठी एंड-टू-एंड क्षमता स्थापित करणे आणि प्रति वर्ष १३ दशलक्ष शुद्ध अल्कोहोलिक लीटर उत्पादन क्षमतेसह आशियातील सर्वात मोठा माल्ट प्लांट तयार करण्याची या प्रकल्पाची कल्पना आहे.

हा प्रकल्प ७०० ते ८०० लोकांसाठी प्रत्यक्ष रोजगार निर्मितीसाठी तयार आहे, ज्यामुळे संपूर्ण क्षेत्रामध्ये अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तसेच या सुविधेमुळे शेतकऱ्यांना उच्च दर्जाची बार्लीची लागवड करण्यासाठी नवीन मार्ग उपलब्ध होतील.

# कोणत्याही धर्माची कट्टरता संविधानाला घातक - सरोदे

**प्रतिनिधी**

■ **अंबेजोगाई**

देशातील धार्मिकता अधिकाधिक कट्टर बनविण्याचे सर्व पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. अशी कट्टरता कोणत्याही धर्माची असो ती संविधानाला घातक असते, असे मत प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी व्यक्त केले. नरेंद्र मोदी, अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाहीचा नाश चालवला आहे, असेही ते म्हणाले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, बीडचे माजी खासदार कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे प्रतिष्ठानच्या वतीने 'संविधान संवादा'चे अंबाजोगाई येथे आयोजन केले होते. त्यांच्या सोबत या संवादामध्ये ॲड. बाळकृष्ण निढाळकर आणि ॲड. श्रीया यांनीही सहभाग घेतला. संविधान कीर्तनकार, ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

भारतीय संविधानाची जागोजाग कशी पायमल्ली होते आहे, हे सांगताना सरोदे पुढे म्हणाले की, संविधानिक पदावर असलेली माणसे असंविधानिक वक्तव्य करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अलिकडेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लोकसभा निवडणुकीत 48 पैकी 14 मतदारसंघात 'व्होट जिहाद' झाला आहे असे अत्यंत बेजबाबदार वक्तव्य कोल्हापूर केले आहे. त्याबद्दल त्यांना आम्ही कायदेशीर नोटीस पाठविली आहे. तुम्ही मंत्रीपदाची शपथ घेत असताना स्पष्टपणे कुणाबद्दलही आकस ठेवून वागणार असे वचन दिलेले असते. तरी इथल्या मुस्लिम समाजाविषयी आकसाने, द्वेषाने बरबटलेली विधाने केली जातात. त्यांच्या देशभक्तीवर कायम शंका घेतली जाते. अमित शहा, नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाही नासवली आहे, असेही सरोदे म्हणाले. बदलापूर येथील चिमूरडीवर अत्याचार, त्यातील आरोपीचे इन्कांऊटर, समुद्रातील शिवाजी महाराज यांच्या स्मारकाबाबत भूमिकांबद्दल ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी टोकदार प्रश्न विचारले. त्याला सरोदे यांनी सडेतोड उत्तरं दिली.

# लोकव्यवहारातील मराठीच्या वापराबाबतचा न्यूनगंड सोडावा

## 'मृत्युंजय'च्या कार्यक्रमात कुवळेकरांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**

■ **पुणे**

"मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद आणि अभिमान आपल्या सर्वांनाच आहे. या दर्जामुळे मोठा निधी मिळेल, अनेक सुविधा - नवीन पदे निर्माण होतील. पण त्यानंतरही लोकव्यवहारात मराठी भाषेचे स्थान काय असेल? अस्तित्वापुढील आव्हानांना ही भाषा कशी सामोरी जाईल? हे खरे प्रश्न आहेत. आपण नित्य व्यवहारात ठरवून किंवा नकळत मराठीला बाजूला सारून इंग्रजी किंवा अन्य भाषांना प्राधान्य देत आहोत. यासाठी मराठीला ज्ञानभाषा बनविण्याच्या सातत्यपूर्ण प्रक्रियेला पाठबळ देतानाच लोकव्यवहारात मराठीच्या वापराबाबतचा आपला सध्याचा न्यूनगंड आधी सोडायला हवा", असे स्पष्ट मत ज्येष्ठ संपादक आणि साहित्यिक विजय कुवळेकर यांनी येथे व्यक्त केले. मृत्युंजय प्रतिष्ठान आणि 'मृत्युंजय'कार शिवाजीराव सावंत स्मृति समितीच्या वतीने 18 व्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ संपादक किरण ठाकुर, मृत्युंजय प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. सागर देशपांडे, मृणालिनी सावंत, अमिताभ सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजीराव सावंत साहित्य पुरस्कार यावेळी नाशिकचे राजीव पटेल यांना, तर समाजकार्यविषयक पुरस्कार जळगाव आणि पुणे येथील दीपस्तंभ फाऊंडेशनचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन यांना कुवळेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रारंभी मृत्युंजय प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा मृणालिनी सावंत यांच्या हस्ते मान्यवरांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. सागर देशपांडे यांनी प्रास्ताविकात 'मृत्युंजय'कारांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांच्या जन्मगावी आजरा, कोल्हापूर आणि पुणे येथे विविध स्वरुपात साकारण्यात आलेल्या स्मारकांविषयीची माहिती दिली. पुरस्कार स्वीकारल्यानंतर राजीव पटेल आणि यजुर्वेंद्र महाजन यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



**पुरस्कार प्रदान सोहळ्यात डावीकडून मृणालिनी सावंत, डॉ. सागर देशपांडे, यजुर्वेंद्र महाजन, विजय कुवळेकर, राजीव पटेल, किरण ठाकुर आणि अमिताभ सावंत**

अमिताभ सावंत यांनी शेवटी आभार मानले. या कार्यक्रमास चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांची नात विद्या फाळके-गोरे, माजी कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर, विवेक सावंत, उदय पंचपोर, माजी न्यायमूर्ती व्ही. के. देशपांडे, हिंदी साहित्यिक डॉ. दामोदर खडसे, मनशक्तीचे प्रमोदभाई शिंदे, डॉ. राजा-रेणू दांडेकर, डॉ. विकास हरताळकर, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र खेर, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका डॉ. संगीता बर्वे, वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्वेष मुक्त महाराष्ट्रासाठी राबवले जाणार 'सजग रहो' अभियान

## विविध सामाजिक संस्थांच्या पुण्यात झालेल्या बैठकीत घेण्यात आला निर्णय

**प्रतिनिधी**

■ **बारामती**

पुणे- विकसित महाराष्ट्रासाठी 'विद्वेषमुक्त महाराष्ट्रा'चा संकल्प विविध संस्थांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत करण्यात आला. महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांच्या पुण्यात झालेल्या बैठकीत विकसित महाराष्ट्रासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत याच अनुषंगाने जनतेपर्यंत 'सजग रहो' या अभियानाच्या माध्यमातून पोहोचण्याचा निर्धार केल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. 'सजग रहो' अभियानाच्या वतीने काल यासंदर्भात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते क्षितिज टेक्सास गायकवाड, पद्मश्री गिरीश प्रभुणे, दलित साहित्याचे अभ्यासक डॉ. धनंजय भिसे, ॲड. अभिजित देशमुख यांनी संबोधित केले.

या बैठकीसंदर्भात आणि त्यातील मुद्द्यांबाबत पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. बैठकीला महाराष्ट्रातील विविध ६५ संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यात ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेवराव कांबळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रमुणे, मातंग साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. धनंजय भिसे, दलित चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक-अध्यक्ष मिलिंद कांबळे, ज्येष्ठ माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, सुदर्शन वाहिनीचे संस्थापक सुरेश चव्हाणके, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते क्षितिज गायकवाड, ज्येष्ठ माध्यमकर्मी डॉ. उदय निरगुडकर, शिवसृष्टीचे अध्यक्ष जगदीश कदम, विवेक विचार मंचचे प्रदीपदादा रावत यांच्यासह दोनशे प्रतिनिधी या बैठकीत सहभागी झालेले होते, अशीही माहिती यावेळी देण्यात आली.

विकसित भारताची संकल्पना मांडून त्या दिशेने गेल्या १० वर्षांत दमदार वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्रात मात्र या वाटचालीला रोखण्यासाठी विविध मार्गांनी बुद्धिभेद करण्यात येत आहे. हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी महाराष्ट्रात शिवछत्रपतींनी अठरापगड जातींना एकत्र आणले आणि विविध पातशाह्यांना आस्मान दाखविले, त्याच महाराष्ट्रात जातीय विद्वेष जाणीवपूर्वक पोसण्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे. देशातील सर्वाधिक प्रगतिशील असलेल्या महाराष्ट्रासमोरचे हे आव्हान पेलण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांना सक्रिय भूमिका घेणाची वेळ आलेली आहे, अशी भावना या बैठकीतील विविध प्रतिनिधींनी व्यक्त केली.

देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या हे इरादे उधळून लावले पाहिजेत, यावरही बैठकीत एकमत व्यक्त करण्यात आले. महाराष्ट्रविरोधी आणि हिंदूंमध्ये फूट पाडण्यासाठीच विचार करणाऱ्या शक्तींना रोखण्यासाठी समाजाशी संवाद साधण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

'श्रेष्ठ महाराष्ट्र – विकसित महाराष्ट्रा'चा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात जनजागृतीसाठी 'सजग रहो' हे अभियान सुरु करून ते राबवण्याचा महत्वाचा निर्णयही या वेळी घेण्यात आला.

## राष्ट्रीय कबड्डीपटू भाग्यश्री भुर्के यांची मोरोक्कोतील आंतराष्ट्रीय कामगार परिषदेसाठी निवड

**मुंबई :** पश्चिम रेल्वेच्या माजी राष्ट्रीय कबड्डीपटू आणि कामगार नेत्या भाग्यश्री भुर्के (पूर्वाश्रमीच्या लता कटक ) यांची पश्चिम रेल्वे मजदूर संघाच्या प्रतिनिधी म्हणून मार्राकेश, मोरोक्को येथे आयोजित आंतरराष्ट्रीय ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशनच्या ४६ व्या आयटीएफ काँग्रेस कॉन्फरन्ससाठी निवड झाली आहे.कबड्डीत राष्ट्रीय स्तरावर पराक्रम साकारणाऱ्या भाग्यश्री या सध्या रेल्वे कामगार वर्कशॉप,महालक्ष्मी येथे कार्यरत आहेत. भाग्यश्री यांची आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेसाठी निवड झाल्यामुळे कबड्डी आणि कामगारक्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. मोरोक्कोत त्या इंडियन रेल्वेमेन्स असोसिएशन आणि इंडियन ट्रेंड युनियन काँग्रेसचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



## 'ठाणे जिल्हा नॅचरल श्री' शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन

■ ठाणे

उत्तेजक द्रव्ये आणि नको असलेल्या प्रोटीनच्या सेवनामुळे शरीरावर होणाऱ्या दुष्परिणामांची वाढत्या वयात जाणीव करून देण्यासाठी ठाणे जिल्हा नॅचरल स्पोर्ट्स संघटनेतर्फे पाचव्या ठाणे जिल्हास्तरीय नॅचरल श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हि स्पर्धा २० ऑक्टोबर रोजी दुपार आणि सायंकाळ अशा दोन सत्रात होणार आहे.

स्पर्धेचे प्रमुख संयोजक विनायक केतकर म्हणाले, उत्तेजक द्रव्य हि क्रीडाक्षेत्राला लागलेली मोठी कीड आहे. उदयोन्मुख क्रीडापटूंना याची ओळख आणि माहिती लहान वयातच करून द्यायला पाहिजे. त्यामुळे ठाणे जिल्हा नॅचरल स्पोर्ट्स संघटनेने खेळाडूंमध्ये जागृती करण्यासाठी या शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आला आहे. हि स्पर्धा सात विविध गटात रंगणार असून त्यात वय वर्षे १०, ११ ते १५, १६ ते २०, २१ ते २५ , खुला वर्ग उंची १६५ सेंटीमीटर पर्यंत, १६५ ते १७० सेंटीमीटर आणि १७० सेंटीमीटरवरील आदी गटांचा समावेश आहे. घंटाळी येथील ब्राम्हण शिक्षण मंडळाच्या शाळेतील सभागृहात होणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येईल .

स्पर्धेच्या प्रवेशिका आणि स्पर्धकांचे उंचीमापन १३ ऑक्टोबरला रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत केतकर हाऊस, बेडेकर रुग्णालयाजवळ, राम मारुती मार्ग, नौपाडा ठाणे पश्चिम येथे स्वीकारल्या जातील .अधिक माहितीसाठी विनायक केतकर यांच्याशी ९९८७५५०८७७ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

## पार्ले टिळक शाळेच्या दोन माजी विद्यार्थ्यांनी सर केले एव्हरेस्ट

प्रतिनिधी
■ मुंबई



सिद्धार्थ टेंबे आणि अमेय जोशी या पार्ले टिळक शाळेच्या (इंग्रजी माध्यम) १९९७ च्या बॅचचे हे दोघे माजी विद्यार्थी.बर्फाच्छादित उंच पर्वतरांगांचे परिपूर्ण मिश्रण असलेले ११० किलोमीटरचे अंतर पार करत या दोन मित्रांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प पार करण्याचा विक्रम केला. ५,३६४ मीटर (१७,६०० फूट) उंचीवर आणि गोठणबिंदूच्या खाली तापमान कमी होत असताना एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेकचा थरारक अनुभव आला. अविरत हिमवृष्टी, पाऊस आणि भूस्खलन, निसर्गाच्या कोपाचा सामना करत असताना प्रवास थोडा कठीण होत चालला होता. पण सकारात्मक विचारसरणी, अमर्याद इच्छाशक्ती, दृढनिश्चय आणि आत्मविश्वासाच्या जोरावर संपूर्ण गटाने सर्व अडचणींविरुद्ध मिशन पूर्ण केले.

सिद्धार्थ टेंबे यांनी सांगितले की, गेल्या १८ सप्टेंबरपासून ते ,२ ऑक्टोबर पर्यंत (एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक, नेपाळ) पर्यंत साहसी प्रवासाला निघाले.यामध्ये मुंबई, पुणे आणि नाशिक येथील १२ उत्साही गिर्यारोहक होते.सुंदर विचित्र गावे, खडकाळ वाट, न संपणारे धबधबे आणि ओढे, हिरवेगार, सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावर स्मितहास्य असलेले स्थानिक लोकांचे उबदारपणा, स्वादिष्ट गरम जेवण आणि बर्फाच्छादित उंच पर्वतरांगांचे परिपूर्ण मिश्रण असलेले ११० किलोमीटरचे अंतर पार केले. वास्तविक पर्वत दोरीने आणि मुठीने चढत नाहीत, तर गिर्यारोहकाच्या अदम्य आत्म्याने चढतात असेही ते म्हणाले.

अमेय जोशीने गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत माझ्यासोबत हिमालय आणि सह्याद्रीमध्ये जवळपास १० ट्रेक केले आहेत. कदाचित माझा शाळेतील एकमेव मित्र ज्याने साहस आणि घराबाहेर जाण्याची तीव्र आवड माझ्यात निर्माण केली. असेही ते म्हणाले

पार्ले टिळक शाळेतील आम्ही दोघे मित्र म्हणून एके दिवशी आम्ही एकत्र येवू, एव्हरेस्ट बेस कॅम्प पार करण्याचे उच्च दर्जाचे मानकरी ठरू याचा मोठा आनंद आम्हा दोघांना झाल्याचे टेंबे यांनी सांगितले.हा एक आदर्श आणि अनेकांसाठी प्रेरणा असून भविष्यात आणखी अनेक ट्रेक आणि बकेटलिस्ट आम्ही दोघे एकत्र पार करणार असल्याचा दृढ विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## वसई-विरार मॅरेथॉन 8 डिसेंबरला



प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार महापालिका आणि वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने ८ डिसेंबरला १२वी राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत ४२ किमी, २१ किमी, १० किमी, ५ किमी अंतरांच्या शर्यतींसह इतर आकर्षक गटांचा समावेश आहे. नवीन वयोगटांमध्ये वृद्ध व ज्येष्ठ नागरिकांसाठी खास स्पर्धा ठेवण्यात आली आहे. तसेच, विद्यार्थ्यांसाठी व विशेष गटांकरिता नोंदणी शुल्क सवलतीत उपलब्ध आहे.

सर्व शर्यतींसाठी स्पर्धेच्या मार्गांची मोजणी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात आली आहे. यावर्षी, प्रमुख रेससह ग्रुप आधारित 'बॅटल रन' स्पर्धाही पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. विजेत्यांसाठी एकूण ५८ लाख रुपयांची भरघोस बक्षिसे असून, देशभरातील नामांकित धावपटूंना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली असून, जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ आयोजित मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनाला ॲथलेटिक फेडरेशन ऑफ इंडिया-दिल्ली, महाराष्ट्र ॲथलेटिक असोसिएशन व पालघर जिल्हा ॲथलेटिक असोशिएशन या तीनही क्रीडा संस्थांची मान्यता मिळाली आहे. स्पर्धेचा मार्ग हा ओम्स या संस्थेने मोजमाप करुन प्रमाणित करुन दिला आहे.मॅरेथॉन स्पर्धा दोन विभागात केली असून टाईम रेस मुख्य स्पर्धा या मध्ये 42 किमी. 21 किमी, 10 किमी, 5 किमी अशा स्पर्धा आहेत.11 किमी ची रेस स्पर्धकांच्या सुचनेनुसार 10 किमी केली आहे. या स्पर्धेचा मार्गामध्ये तसेच मुख्य स्पर्धांच्या मार्गामध्ये कोणताही बदल केला नाही.या स्पर्धेतील विविध गटातील विजेत्यांवर मिळून एकूण ५८ लाख रुपयांची बरसात केली जाणार आहे.

42 किमी व 21 किमी व 10 किमी करिता (850 अधिक कर) असे मिळून 1039/- रुपये नोंदणी शुल्क असून व 5 किमी करिता (800 अधिक कर) असे मिळून 977/- इतके आहे.धमाल धाव प्रती स्पर्धक (100 अधिक कर) असे मिळून 122/- इतके आहे.धम्माल धाव स्पर्धेमध्ये स्थानिक नागरिकांच्या ग्रुप मध्ये 5 व त्या पेक्षा जास्त स्पर्धक असल्यास- ग्रुप करिता 500/- रुपये, 10 व त्या पेक्षा जास्त असल्यास 1000/- इतकी फी ठेवली आहे.नवीन वयोगट : वृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांना धावण्याच्या माध्यमातून निरोगी राहण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या हेतुने मॅरेथॉन स्पर्धेमध्ये तीन वयोगटांची भर घातली आहे.

***58 लाखांची एकूण भरघोस बक्षीसे***

42 किमी स्पर्धे करिता एकूण : 20,35,000/- ,21 किमी स्पर्धे करिता एकूण : 17,50,000/- ,10 किमी स्पर्धे करिता एकूण 4,50,000/-, 5 किमी स्पर्धे करिता एकूण 2,40,000/-,42 किमी / 21 किमी /10 किमी (वसई तालुका स्वतंत्र गट) स्पर्धेकरिता एकूण 5,74,000/-, बैटल रन स्पर्धे करिता एकूण 3,00,000/-, धम्माल धाव एकूण बक्षिसे : 61,500/, शालेय गटातील एकूण बक्षिसे रक्कम : 89,500/-, ज्येष्ठ नागरिक व व्हीलचेअर गटातील एकूण बक्षिसे रक्कम : 70,950/-, फोटोग्राफी स्पर्धा देखील आपण भरवली असून त्यांना देखील रोख रक्कम रु.30,000/- इतके बक्षिसे दिले जाणार आहे.

## 'माझी माऊली चषक कॅरम' स्पर्धेत वेदांत राणे विजेता

प्रतिनिधी
■ मुंबई



सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित माझी माऊली चषक आंतर शालेय विनाशुल्क कॅरम स्पर्धेचे विजेतेपद युनिव्हर्सल स्कूल-दहिसरच्या वेदांत राणेने पटकाविले. अतिशय चुरशीच्या अंतिम सामन्यात अचूक फटक्यांची आतषबाजी करीत वेदांत राणेने प्रारंभी ७-० अशी मोठी आघाडी घेणाऱ्या आयईएस पाटकर विद्यालय-डोंबिवलीच्या नील म्हात्रेचे आव्हान १२-११ असे संपुष्टात आणले आणि अजिंक्यपदाला गवसणी घातली. परिणामी नील म्हात्रेला अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार विजेते अनिल घाटे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या उपस्थितीत विजेत्या-उपविजेत्यांना गौरविण्यात आले.

तत्पूर्वी दैवत रंगमंच, जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड-भायखळा येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात वेदांत राणेने सेंट जोसेफ हायस्कूल-डोंगरीच्या स्वस्तिक सुर्वेचा २५-२ असा तर नील म्हात्रेने ससून जेकब हायस्कूल-नागपाडाच्या मयांक सोळंकीचा २५-० असा पराभव केला. स्पर्धेमधील उपांत्यपूर्व उपविजेतेपदाचा पुरस्कार आयएनजी इंग्लिश स्कूल-वसईचा श्रीशान पालवणकर, बाबासाहेब आंबेडकर एमपीएस-वरळीचा समीर खान, डॉ. शिरोडकर हायस्कूल-परेलचा वेदांत हळदणकर, ह्यूम हायस्कूल-नागपाडाचा आयुष पालकर यांनी जिंकला. याप्रसंगी आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी, नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व स्पोर्ट्स असोसिएशन फॉर स्कूल चिल्ड्रेन यांच्यातर्फे यंदा क्रीडा मार्गदर्शकाचा पुरस्कार पात्र ठरलेले नामवंत कबड्डीपटू व प्रशिक्षक अनिल घाटे यांचा शाल, श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच क्रीडा संघटक निवृत्ती देसाई, कॅरम पंच चंद्रकांत करंगुटकर, मंडळाचे पदाधिकारी कृष्णा रेणोसे, भूषण परुळेकर, अनिल शेलार, अशोक मुलकी, गौतम कांबळे, प्रमोद पाताडे आदी मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

## मुंबई पोलीस, रिझर्व्ह बँक, मुंबई कस्टम, हिंदुजा रुग्णालय विशेष गटाच्या बाद फेरीत

■ मुंबई



मुंबई पोलीस, रिझर्व्ह बँक, मुंबई कस्टम, हिंदुजा रुग्णालय यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या विशेष व्यावसायिक गटाची बाद फेरी गाठली. नवोदित संघ, शिवमुद्रा प्रतिष्ठान यांनी कुमार गटाच्या उपांत्य फेरीत धडक दिली. दादर(पूर्व) येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू असलेल्या विशेष व्यावसायिक गटाच्या फ गटात मुंबई पोलिसांनी गंधेकर इलेक्ट्रिकचा ४०-२५ असा पराभव केला खरा.पण सुरुवातीची १० मिनिटे गंधेकर संघाने पोलिसांच्या तोंडाला फेस आणला. गंधेकरच्या ऋतिक नागलेने एकाच चढाईत ३ गडी टिपत ६व्या मिनिटाला पोलीस संघावर लोण दिला आणि १४-०४ अशी आघाडी घेतली. पण गंधेकर संघाला ती टिकविता आली नाही. पोलीस संघाने आपला खेळ गतिमान करीत पूर्वार्धात २लोण देत २३-१७ अशी आघाडी घेतली. यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. पोलिसांच्या हनुमंत गर्जेने एकाच चढाईत ४गडी टिपत या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याला रणजित मस्केची उत्तम साथ लाभली. गंधेकर संघ अनुभवात कमी पडल्याने त्यांना साखळीतच गारद होण्याची वेळ आली.

हिंदुजा रुग्णालयाने ड गटात अत्यंत चुरशीच्या लढतीत के.ई.एम. रुग्णालयाचा २२-१९ असा पाडाव करीत बाद फेरीतील आपले स्थान निश्चित केले. मध्यांतराला ११-०९ अशी आघाडी घेणारा हिंदुजा संघ शेवटच्या काही मिनिटात पिछाडीवर पडला होता. पण शेवटी हिंदुजाने ३गुणांनी बाजी मारली.



*मुंबई : भारतीय जनता पार्टी वार्ड क्रमांक 57 चे उपाध्यक्ष संजय बन्साली यांचा मंगळवारी खासदार, काँग्रेस मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड व मुंबई उपाध्यक्ष माधवी राणे व 57 चे ब्लॉक अध्यक्ष गौरव राणे व गोरेगावचे तालुका अध्यक्ष (एससी सेल) प्रवीण शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश झाला.*

पवई जयभीम नगरवर कारवाई प्रकरणी

## पोलीस अधिकारी व पालिका अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिका आणि पवई पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी बिल्डरशी संगनमत करून ६ जूनच्या सकाळी पवई येथील जयभीम नगरमधील गरीब कुटुंबांच्या घरावर कारवाई करून त्यांना बेघर केले होते. या कारवाईतील पालिका अधिकारी व पोलीस अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. या आदेशाचे स्वागत करून पोलीस उपायुक्त,पालिका एस विभागाचे अधिकारी, पालिका उपायुक्त आणि पवईच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक या मुजोर अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, या मागणीचा प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष व CWC सदस्य नसीम खान यांनी पुन्नरुच्चार केला आहे.

यासंदर्भात बोलताना नसीम खान म्हणाले की, अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली नियमबाह्य कारवाई करून पवईच्या जयभीम नगर मधील ६०० कुटुंबियांना भर पावसाळ्यात बेघर करण्यात आले. यासंदर्भात एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे आदेश मुंबई हायकोर्टाने दिले होते, आज एसआयटीच्या अहवालावर सुनावणी करताना कोर्टाने या मुजोर अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. त्यामुळे गरीब कुटुंबाना न्याय मिळेल असा विश्वास आहे. पालिका एस वार्डचे अधिकारी, पवई पोलीस स्टेशनचे अधिकारी, स्थानिक बिल्डर आणि स्थानिक नेत्यांनी हातमिळवणी करून सरकारच्या संरक्षणाखाली ६०० कुटुंबाना नियमबाह्य पद्धतीने बेघर करून रस्त्यावर आणले होते. या विरोधात काँग्रेस पक्षाने सातत्याने आवाज उठवला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून या मुद्द्याकडे त्यांचे लक्षही वेधले होते. या प्रकरणी राज्यपाल महोदयांची भेटही घेतली होती. या गरीब कुटुंबांना न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरुच राहिल असेही नसीम खान म्हणाले.

## 'मराठा मंदिर'चे वधू वर सूचक केंद्र

**मुंबई :**मुंबई स्थित मराठा मंदिर प्रागतिक संघाच्या वतीने मुंबई सेंट्रल येथील कार्यालयात वधू वर सूचक केंद्राचा उपक्रम नव्याने राबवला जात आहे. या वधू वर सूचक केंद्रात मराठी भाषिक असणाऱ्या सर्व जातींसाठी हे केंद्र अत्यंत माफक वर्गणी घेऊन प्रेमळ व आपूलकीच्या भावनेने चालवले जाणार आहे. संस्थेने हा उपक्रम सामाजिक गरज लक्षात घेऊन राबविण्याचे ठरविले आहे व त्याचा लाभ समस्त समाजबांधवांनी घ्यावा असे आवाहन वधू वर सूचक केंद्राचे कार्याध्यक्ष श्री प्रदीप विचारे यांनी केले आहे. वधू वर सूचक केंद्र आठवड्याचे दोन दिवस म्हणजे दर बुधवार व शनिवारी (दुसरा व चौथा शनिवार सोडून) दुपारी चार ते सात वाजता जनतेसाठी उपलब्ध आहे दुरध्वनी क्रमांक ०२२-६६०४४१५०वर अथवा मराठा मंदीर ,2रा माळा ,मुंबई सेंट्रल येथे संपर्क साधावा

## महाराष्ट्राने दिल्लीतील दोन ठगांची गुलामगिरी का स्वीकारावी?

**पान १ वरुन...** काय म्हणून आम्ही या दोन ठगांची गुलामगिरी स्वीकारायची, कोण लागतात तुम्ही आमचे? दुर्दैवाने तुम्ही तिकडे बसलात, आमचंच पाप आहे. कोणी तुम्हाला ओळखत नव्हतं तुम्हाला खांद्यावर बसवून आम्ही नेलं, हे आमचं पाप आहे. हे जाहीररित्या मला कबुल करावं लागतंय. हे दुर्दैवं आहे. पण जेव्हा गरज होती तेव्हा तुम्ही आमचा खांदा वापरलात. खांद्याचे दोन अर्थ होतात. तेव्हाही तुम्हाला दिला आताही तुम्हाला राजकारणामध्ये खांदा द्यायची इच्छा आहे. आताही आमची इच्छा आहे की राजकारणात तुम्हाला खांदा द्यावा. जनता वाटच बघतेय, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" या लेखाशिर्षकांतर्गत प्रभाग क्र. २०/ब मधील सुशोभिकरण करणे असे एकुण दोन कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/ सुरुआहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https:// mahatenders.gov.in/ येथे दि. ०९/१०/२०२४ ते दि.१६/१०/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग दि.१६/१०/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. १७/१०/२०२४ रोजी १६.३० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा -मु/७१८/२०२४-२५
दि.०८.१०.२०२४

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**



**नवी मुंबई महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना क्र./वृक्ष प्रा./29/2024-2025**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसाव्दारे असे जाहीर करण्यात येते की,**

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | झाडाचा प्रकार | एकूण तोडणे | एकूण स्थलांतरीत | झाड तोडणे/स्थलांतरीत करावयाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मे. एम.एम.आर.डी.ए, कार्यकारी, अभियंता बांद्रा, कुर्ला कॉम्प्लेक्स (पुर्व), मुंबई. | फॉक्सेटल पाम | 12 | 79 | सदरची झाडे ठाणे बेलापूर ऐरोली ते कटाई नाका जोडणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामात अडथळा निर्माण करित असल्याने एकुण 179 झाडांपैकी एकुण 35 नग झाडे तोडणे व एकुण 144 नग झाडे स्थलांतरित करणे. |
| | | चाफा | 0 | 34 | |
| | | मृत वृक्ष | 1 | 0 | |
| | | चारकोल ट्री | 1 | 0 | |
| | | सप्तपर्णी | 2 | 0 | |
| | | सोनमोहर | 17 | 18 | |
| | | सुभाबुळ | 1 | 0 | |
| | | देशी बदाम | 0 | 2 | |
| | | फणस | 0 | 1 | |
| | | आंबा | 0 | 1 | |
| | | गुलमोहर | 1 | 4 | |
| | | पिंपळ | 0 | 3 | |
| | | रेन्ट्री | 0 | 1 | |
| | | ताम्हण | 0 | 1 | |

**सदर प्रस्तावास वृक्ष तोडणे/स्थलांतरित करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरूपात ई विभाग कोपखैरणे, से.6, कोपरखैरणे, नवी मुंबई विभागास कळविणे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

जाहीरात प्रसिध्दीचा दिनांक 09 / 10 /2024

सही /-
**(दिलीप नेरकर)**
**उप आयुक्त (उद्यान) तथा सचिव वृक्ष प्राधिकरण**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/583/2024**



**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

वायू विद्युत केंद्र, उरण येथे खालील कामांच्या पुरवठा/ कामांसाठी अनुभवी व प्रतिष्ठित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या जात आहेत:

| ई-निविदा | वर्णन | अंदाजित खर्च/ ई.एम.डी. (रु.) | विक्री कालावधी | भरण्याची अंतिम तारीख (१५.०० तासांपर्यंत) |
|---|---|---|---|---|
| शुद्धिपत्र ई-निविदा ३००००५०९०१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे विविध चाचणी साधनांचा पुरवठा करणेबाबत. | ०९.१५ लक्ष १२,६५२/- | ०९.१०.२०२४ ते १४.१०.२०२४ | १५.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८४१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे विविध फास्टनर्सचा पुरवठा करणेबाबत. | १४.५५ लक्ष १८,०५०/- | ०९.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ | २९.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८४२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे जॉब सेफ्टी ॲनालिसिसचे काम पार पाडणेबाबत | ०३.८० लक्ष ७,३००/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८४८ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील ई.एस.आर., कॉलनीतील ओव्हरहेड वॉटर स्टोरेज टाक्या आणि पॉवर हाऊस परिसराची स्वच्छता करण्याचे काम करणेबाबत. | ०२.३३ लक्ष ५,८३८/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८५६ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे प्रकल्पाच्या अग्निशमन लेखापरीक्षणाचे काम हाती घेणेबाबत | ०२.०० लक्ष ५,५००/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८९३ | वायू विद्युत केंद्र, उरण जी.टी.पी.एस. वसाहती आणि जी.टी.पी. एस. आवारात डास नियंत्रणासाठी वार्षिक कामाचा करार करणेबाबत. | ०२.३६ लक्ष ५,८६८/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८९४ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील जी.टी. युनिट्ससाठी सी. डब्ल्यू. पंप, सी. डब्ल्यू मेक अप पंप, कॉलनी रॉ वॉटर पंप आणि प्लांट ड्रिंकिंग वॉटर पंपांच्या दुरुस्तीचे काम करणेबाबत. | ०१.८६ लक्ष ५,३६०/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१८९५ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील जी.टी. एक्झॉस्ट डक्टची, दुरुस्ती आणि पॅचिंगचे काम करणेबाबत. | ०५.०४ लक्ष ८,५४०/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२०७७ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील वनस्पती आणि वसाहती क्षेत्रातील गवत, झुडपे काढून टाकणे आणि झाडांच्या फांद्यांचा छाटणी करणेबाबात. | ०९.८९ लक्ष १३,३९६/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२०८१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे बीर बॉयलरसाठी एचपी आणि एलपी इलेक्ट्रॉनिक ड्रम लेव्हल इंडिकेटर (ईडीएलआय) प्रणालीच्या कंडक्टिव्हिटी प्रोबसह पाण्याच्या स्तंभाचा पुरवठा, स्थापना, उभारणी आणि कार्यान्वित करणेबाबत. | ४९.६८ लक्ष ५३,१८०/- | ०९.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ | २९.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२१५४ | जी.टी.पी. एस., उरण येथील मेजर स्टोअरमध्ये स्ट्रक्चरल स्टीलच्या कामासह रॅक तयार करण्यासाठी कामाचे कंत्राट करणेबाबत. | ०५.५० लक्ष ९,००८/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२२३९ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील विविध सबमर्सिबल पंप आणि वाल्व मोटर्सच्या दुरुस्ती/ रिवाइंडिंगसाठी वार्षिक दर करार करणेबाबत. | ५.४३ लक्ष ८,९३८/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२१७३ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील जलशुद्धीकरण केंद्रासाठी डीओ मीटर, व्हिस्कोमीटर, टर्बिडिटी मीटर आणि क्कार्ट्ज क्युव्हेटचा पुरवठा करणेबाबत. | १२.२१ लक्ष १५,७१२/- | ०९.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ | २९.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२१७१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील GT फिल्टर हाऊसमधील मॉइश्चर फिल्टर्स वॉटर ड्रेनेज सिस्टीमची दुरुस्ती/सुधारणा करणेबाबत. | १०.५० लक्ष १४,०००/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२१७२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील WT प्लांटमध्ये रासायनिक डोसिंग/अनलोडिंग पंप (ॲसिड/अल्कली, हायड्राझिन/ अमोनिया, पॉलीइलेक्ट्रोलाइट इ.) च्या प्रतिबंधात्मक देखभाल आणि दुरुस्तीचे काम करणेबाबत. | ९.३७ लक्ष १२,८७४/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२१३२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे विविध गॅस्केट आणि पॅकिंगचा पुरवठा करणेबाबत. | ९.४७ लक्ष १२,९७१/- | ०९.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ | २९.१०.२०२४ |
| ई-निविदा ३००००५२२३८ | वायू विद्युत केंद्र, उरण येथील कॉलनीतील मॅनहोल्स, सेप्टिक टाक्या, तपासणी चेंबर्स आणि कलेक्शन पिट डिसिल्टिंग/ क्लीनिंगसाठी वार्षिक देखभाल करार करणेबाबात. | ०६.५८ लक्ष १०,०८७/- | ०९.१०.२०२४ ते २२.१०.२०२४ | २३.१०.२०२४ |

सर्व निविदांसाठी निविदा किंमत रु.११८०/- निविदा खर्च आणि ई.एम.डी. केवळ ऑनलाईन भरणे.

आमच्या वेबसाइटवर दिनांक **०९.१०.२०२४** पासून विक्रीसाठी निविदा उपलब्ध आहेत किंवा अधिक तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाइटवर **https://eprocurement.mahagenco.in** भेट द्या संपर्क तपशील:- **EE (P&C) - 91-9167007841**

विक्रेत्यांना विनंती कि ई-निविदेसाठी फर्म नोंदणी करून घ्यावी.
कृपया आमच्या वेबसाईटवर लॉगइन करा **https://eprocurement.mahagenco.in**

**Sd/-**
**Chief Engineer**
**GTPS Uran**



कदमांची माऊली नवरात्र उत्सव.
करिरोड मुंबई. ( शिवन्या व रुद्रांश कदम )



नवसाला पावणारी नायगावची चंदनाची भवानी माता
मुंबई दादर पूर्व नायगाव सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ



शारदीय नवरात्रौत्सव मंडळ,
तातेर कॉम्प्लेक्स , कर्जत दहिवली



मुघभाट विकास मंडळ (मुघभाट )
(नवसाला पावणारी गिरगावची अंबामाँता )



नुतन सामाजिक, सामाजिक सांस्कृतिक क्रिडा मंडळ, हाशिवरे येथील अंबामाता. यंदा या मंडळाचे 42 वे वर्ष आहे.



अखिल भटवाडी सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ घाटकोपरची आई महाकाली



जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट महिला कर्मचारी



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, 17 वा मजला, मंत्रालय, मुंबई



कांदिवली पूर्व येथील अपेक्स हॉस्पिटलच्या स्टाफ नर्सेस तसेच डॉक्टर
महिला व सहयोगी कर्मचाऱ्यांनी लाल रंग परिधान केला होता



कल्याण दुर्गाडी किल्ल्यावरील दुर्गा मातेचे दर्शन घेताना शालिनी चव्हाण व त्यांच्या सहकारी



शिव शंभो सोसायटी. गोराई ३ बोरिवली.



पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हिसेस ॲण्ड इन्शुरन्स प्रा. लिमिटेड



प्रादेशिक परिवहन कार्यालय,पूणे.



आई एकविरा महिला मंडळ, हाशिवरे, ता. अलिबाग.



बांद्रा लोकल कोर्ट महिला



वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग




**स्वातंत्र्यपुर्व** काळात वडाळ्या गावातील आगरी ,कोळी व ख्रिस्ती बांधवांनी एकोपाचा नारा देउन १९३२ साली सर्वांना एकत्र आणत वडाळ्या गावदेवीची स्थापना केली. वडाळ्यातील प्रतिपंढरपुर म्हणुन प्रसिद्ध असलेले श्री विठ्ठल मंदिराच्या पटांगणात गावदेवीची स्थापना व उत्सव केला जातो. विशेष म्हणजे सुरुवातीपासुन ते आजगायत गावदेवीला साडी नेसवणारे व घटस्थापने दिवशी सनई चौघडा वाजविणारी तिसरी पिढी इथे अजुन सेवा देत आहेत.या वर्षी मंडळ ९३ व्या वर्षात पदार्पण करीत असुन लवकरच मंडळ शताब्दी महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे. मुंबईतील जुन्या मंडळातील एक, सांस्कृतित आणि पारंपारीक पणा जपणे अशी मंडळाची ओळख आहे. वडाळ्यातील पारशी, मुस्लीम, ख्रिस्ती बांधव व इतर अनेक समाजातील लोक देखील मंडळात सभासद असुन न चुकता अष्टमी च्या दिवशी गावदेवीची ओटी भरायला व महाप्रसाद घेण्यास येतात. गावदेवीचे अष्टमीचे रुप बघण्यासाठी भाविकांची खुपच गर्दी होते.